POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३२९ ● मुंबई, सोमवार, ३० जून २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ठरलं तर! ५ जुलै रोजी मोर्चा होईल किंवा सभा
# पण एकत्र जल्लोष करणार हे नक्की : उद्धव ठाकरे

या आधी हिंदी सक्तीच्या विरोधात 5 जुलै रोजी ठाकरे बंधुंचा संयुक्त मोर्चा काढण्यात येणार होता. पण सरकारच्या जीआर रद्दच्या घोषणेनंतर हा मोर्चा निघणार नसल्याचं स्पष्ट करण्यात आलं. पण 5 तारखेला विजयी मोर्चा काढायचा किंवा काही सभा घ्यायची का यावर विचार सुरू असल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले. 5 जुलै रोजी काहीतरी कार्यक्रम नक्की घेणार असंही ते म्हणाले. या संदर्भात मनसे, इतर पक्ष आणि मराठीच्या लढ्यात उतरलेल्या सर्व संस्थांशी चर्चा करणार असल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले.

**■मुंबई । प्रतिनिधी :**

मराठी माणसाची शक्ती पाहून या सरकारने माघार घेतली, हिंदी सक्ती मागे घेतली. त्यामुळे हा मराठी एकजुटीचा विजय असल्याची प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली. मराठी माणूस एकत्र येऊ नये म्हणून भाजपने सर्व प्रयत्न केले असंही ते म्हणाले. ५ जुलै रोजी विरोधाचा मोर्चा होणार होता. पण आता तो होणार नसून त्या ऐवजी विजयी मोर्चा किंवा जल्लोष सभा घेण्यासाठी चर्चा करू अशी माहिती उद्धव ठाकरे यांनी दिली. राज ठाकरेंशी बोलणं सुरू असल्याचंही उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितलं. त्यामुळे ५ जुलै रोजी कार्यक्रम होणार हे स्पष्ट झालं आहे.



**मराठी माणसाच्या शक्तीपुढे सरकारची सक्ती हरली**

उद्धव ठाकरे म्हणाले की, ''राज्यात पहिलीपासून हिंदी सक्ती करण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. पण त्या विरोधात मराठी माणसाने एकजुट दाखवली. शिवसैनिक आणि इतर पक्ष, संस्थानी त्याला विरोध करत सरकारच्या जीआरची होळी केली. मराठी माणसाच्या दबावामुळे राज्य सरकारने हा जीआर रद्द केला. मराठी माणसाच्या शक्तीपुढे सरकारची सक्ती हरली.''

**मराठी एकजुट कायम असावी**

मराठी माणूस एकत्र येऊ नये यासाठी भाजपने प्रयत्न केला. पण मराठी एकजुटीसमोर त्यांना नमावे लागले. एकत्रित मोर्चा होऊ नये यासाठी त्यांनी प्रयत्न केला. पण यापुढे संकट आल्यावर जागे व्हायचे असं नको. त्यामुळे ही एकजुट कायम राहावी असं उद्धव ठाकरे म्हणाले.

**राज्य सरकारकडून हिंदीचा जीआर रद्द**

पहिलीपासून हिंदी भाषा लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने मागे घेतला आहे. या संदभार्तील दोन्ही जीआर रद्द केल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. राज्यात त्रिभाषा सूत्र लागू करावे की नाही यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येणार आहे. ही समिती माशेलकर समितीचा अभ्यास करणार आणि त्यावर शिफारशी करणार आहे. त्यानंतर राज्यात त्रिभाषा सूत्र लागू करावं की नाही याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. दरम्यान, राज्य सरकारने हिंदीचा जीआर रद्द केला हा मराठी एकजुटीचा विजय असल्याचं मत संजय राऊत तसेच मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केलं.

**महापालिका निवडणुकीपूर्वी मोठा धक्का**

लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यात महाविकास आघाडीला चांगलं यश मिळालं होतं. महायुतीमधील अनेक दिग्गज उमेदवारांचा पराभव झाला, मात्र त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीनं जोरदार पुनरागमन केलं. राज्यात महायुतीचे उमेदवार तब्बल २३२ जागांवर विजयी झाले तर महाविकास आघाडीला अवघ्या ५० जागांवर समाधान मानावलं लागलं. दरम्यान विधानसभेत झालेल्या मोठ्या पराभवानंतर आता महाविकास आघाडीला गळती लागल्याचं दिसून येत आहे. महाविकास आघाडीमधील अनेक दिग्गज नेते महायुतीमध्ये प्रवेश करताना दिसत आहेत. याचा सर्वाधिक फटका हा शिवसेना ठाकरे गटाला बसला आहे. आतापर्यंत शिवसेना ठाकरे गटातून अनेक नेते आणि पदाधिकाऱ्यांनी शिवसेना शिंदे गट आणि भाजपात प्रवेश केला आहे. ही पक्षगळती शिवसेना ठाकरे गटासाठी डोकेदुखी ठरली असून, तीला ब्रेक लावण्याचं मोठा आव्हान आता पक्षासमोर असणार आहे. दरम्यान त्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. तो म्हणजे शिवसेना ठाकरे गटातील तब्बल ३०० कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. विलेपार्ले विधानसभा मतदारसंघातील हे सर्व कार्यकर्ते आहेत. वांद्रे पूर्व येथे एका कार्यक्रमात कुणाल सलमळकर यांच्या नेतृत्वाखाली आणि माजी खासदार गजानन कीर्तिकर यांच्या हस्ते ३०० कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

पुढील काही महिन्यांमध्ये राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. यामध्ये मुंबई महापालिका निवडणुकीचा देखील समावेश आहे. राज्यात सध्या निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्याचं लक्ष हे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे लागलं आहे. या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडी बाजी मारणार की महायुती याबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र दुसरीकडे निवडणुकीपूर्वीच ठाकरेंना मोठा धक्का बसला आहे. आज शिवसेना ठाकरे गटातील तब्बल ३०० कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. विलेपार्ले विधानसभा मतदारसंघातील हे सर्व कार्यकर्ते आहेत. वांद्रे पूर्व येथे एका कार्यक्रमात कुणाल सलमळकर यांच्या नेतृत्वाखाली या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

---

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सर्वात मोठी घोषणा
# त्रिभाषा सूत्राबाबतचे दोन्ही शासन निर्णय रद्द

**■मुंबई । प्रतिनिधी :**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकवली जाण्याच्या निर्णयाला कठोर विरोध केला जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्य सरकारने तसा निर्णय घेतला होता. मात्र सरकारच्या या निर्णयाला मोठ्या प्रमाणात विरोध करण्यात आला होता. आता हाच विरोध लक्षात घेऊन राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबतचे दोन्ही निर्णय रद्द केले आहेत. तसेच एका समितीची स्थापना केली असून या समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील भूमिका ठरवली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.



**शासनाचे दोन्ही जीआर रद्द, फडणवीसांची घोषणा**

हिंदी भाषा विषय लागू करण्याबाबतच्या निर्णयावर चर्चा करण्यासाठी आज मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सांगोपांग चर्चा झाल्यानंतर सरकारने त्रिभाषा सूत्रानुसार हिंदी भाषेचा समावेश करण्याबाबतचे दोन्ही जीआर सरकारने रद्द केले आहेत. तशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत केली.

**देवेंद्र फडणवीस नेमकं काय म्हणाले?**

यावेळी बोलताना, त्रिभाच्या सूत्रांच्या संदर्भात तिसरी भाषा कुठल्या वर्गापासून लागू करावी? ती कशा प्रकारे करावी? मुलांना कोणता पर्याय द्यावा? याबाबतचा निर्णय घेण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात एका समितीची स्थापना करण्यात येईल. नरेंद्र जाधव हे कुलगुरू होते, ते नियोजन आयोगाचे सदस्य होते. आपण त्यांना शिक्षणतज्ञ म्हणून ओळखतो. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वात एका समितीची स्थापना केली जाईल. यात आणखी काही सदस्य असतील. त्यांचीही नावे लवकरच घोषित केली जातील, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

**नंतरच त्रिभाषा सूत्र लागू होणार**

तसेच, या समितीचा अहवाल आल्यानंतरच त्रिभाषा सूत्र या रिपोर्टच्या आधारावच लागू केला जाईल. म्हणूनच १६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ हे दोन्ही शासन निर्णय रद्द करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. हे दोन्ही शासन निर्णय आम्ही रद्द करत आहोत, अशी घोषणाही फडणवीस यांनी केली.

---

## 'मराठी मुलांना कामावरुन काढलं तरच २ महिन्यांचा थकित पगार देईन'
# सरकारी काम करणाऱ्या कंत्राटदाराचं विधान

**■मुंबई । प्रतिनिधी :**

कल्याण ते तळोजादरम्यान मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण म्हणजेच एमएमआरडीएच्या अंतर्गत मेट्रो प्रकल्पाचे काम सुरु आहे. या कामदरम्यान वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून या ठिकाणी काही सुरक्षारक्षक नेमण्यात आले आहेत. हे सुरक्षारक्षक हरियाणामधील गवार कंपनीच्या माध्यमातून या ठिकाणी काम करत आहेत. या ठिकाणी मराठी भाषिक मुलंही मोठ्या प्रमाणात काम करत आहेत. मात्र गेल्या दोन महिन्यांपासून या ठिकाणी सुरक्षारक्षकांना पगार देण्यात आलेला नाही. अखेर या प्रकरणामध्ये शिव जनरल कामगार सेनेचे सरचिटणीस हरीश इंगळे यांनी या ठिकाणा जाऊन थकित पगाराबद्दल जाब विचरला.



**मराठी मुलांना आर्थिक व मानसिक त्रास**

एकीकडे मराठीची अस्मिता त्याचबरोबर हिंदी सक्तीविरोधात दोन्ही ठाकरे बंधू एकत्र मोर्चा काढणार असल्याने महाराष्ट्रात मराठी हा विषय मोठ्या प्रमाणात गाजत आहे. मात्र मराठीच्या मुद्द्यावरुन अशाप्रकारे कामगारांचा पगार न देता त्यांना आर्थिक व मानसिक त्रास देत असल्याने समोर आले आहे. आता महाराष्ट्राच्या प्रकल्पामध्ये मराठी मुलांना कामावर ठेऊ नये अशी मागणी केली जात आहे. त्यामुळे आता या प्रकरणामध्ये पुढे काय होतं हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

**मराठी मुलांना कामावरुन काढा मग पगार देतो**

इंगळे यांनी या ठिकाणी कार्यरत असलेल्या सुपरवायझरला थकित पगाराविषयी विचारलं असता त्यांनी हरियाणामध्ये असलेल्या या या प्रोजेक्टसाठी व्यवस्थापकीय निर्देशक म्हणजेच एमडी म्हणून काम करत असलेल्या व्यक्तीला फोन लावून दिला. सुपरवायझरने फोन लावून दिल्यानंतर एमडीशी इंगळे यांनी संवाद साधला. त्यावेळी या एमडीने चक्क मराठी मुलांना कामावरुन काढून टाकल्यानंतर पगार देईल असे सांगितलं. हे विधान ऐकून हरीश इंगळेंना धक्काच बसला. हरीश इंगळेंनी हे संभाषण आपल्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड केलं. या प्रकरणामध्ये आपण पोलिसांमध्ये गुन्हा दाखल करणार असल्याची माहिती हरीश इंगळेंनी दिली.

**या आधीही असा त्रास**

यापूर्वीही अशाप्रकारे मराठी मुलांना डावलण्यात आल्याचे प्रकार मुंबई आणि उपनगरीय शहरांमध्ये घडल्याचं पाहायला मिळालं आहे. मुंबईतील एका कंपनीने मराठी मुलांनी नोकरीसाठी अर्ज करु नये अशी अट घातली होती. याशिवाय मराठी माणसांना वेगवेगळ्या रहिवाशी संकुलांमध्येही अमराठी लोकांकडून त्रासाचा समाना करावा लागल्याचं पाहायला मिळालं आहे. मराठी लोकांवर वारंवार अशाप्रकारे अन्याय केला जात असतानाच आता थेट आर्थिक कोंडी करत मराठी मुलांना कामावरुन काढून टाकण्याचा कट थेट परराज्यातून केला जात असल्याचं या प्रकरणाच्या निमित्ताने समोर आलं आहे.

---

## छत्रपती संभाजी नगरमध्ये एसटीच्या जागेवर उभे राहणार महाराष्ट्रातील सर्वात मोठे भंगार केंद्र

**■छत्रपती संभाजी नगर । प्रतिनिधी :**

महाराष्ट्रातील सर्वात मोठे भंगार केंद्र एसटीच्या जागेवर उभारले जाणार आहे. एसटीसाठी उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे असलेल्या एसटी महामंडळाच्या १०० एकर जागेवर सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून उभारले जाणार आहे.

जुनी वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्याचे सुटे भाग पुनःश्च वापरात येणार नाहीत, अशा पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावणारे सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर (भंगार केंद्र) एसटी महामंडळ सार्वजनिक- खाजगी भागीदारी तत्त्वावर उभारले जाईल. एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळाच्या आढावा बैठकीमध्ये ही घोषणा करण्यात आली.



सध्या शासनाच्या परवानगी ने राज्यात 8 संस्था स्क्रॅपिंग केंद्र चालवत असून त्यांची वषार्ला किमान 1000 वाहने स्क्रॅप करण्याची क्षमता आहे. भविष्यात सर्वाधिक वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्याची विल्हेवाट लावणारे सर्वात मोठे सेंटर एसटीच्या माध्यमातून उभाले जाणार असून एक नवा उत्पन्नाचा स्त्रोत यातून निर्माण होईल.

केंद्र शासनाद्वारे २०२१ मध्ये रजिस्टर व्हेईकल स्क्रॅपिंग फॅसिलिटी नावाने १५ वषार्पेक्षा जुनी वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्यांच्या सुट्या भागाचा पुनर्वापर होणार नाही, अशा पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावण्यात यावी. यासाठी नवे धोरण बनवण्यात आले. सदर धोरण महाराष्ट्र शासनाने सन. २०२३ मध्ये स्वीकारले असून ऑटोमोटिव्ह इंडस्ट्रि स्टॅंडर्ड च्या अटी शर्तीनुसार स्क्रॅपिंग केंद्राला मान्यता देण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार एसटी महामंडळाला देखील राज्यात ३ ठिकाणी अशा प्रकारचे स्क्रॅपिंग सेंटर उभारण्याची परवानगी मिळाली असून त्यापैकी पहिले आणि राज्यातील सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे असलेल्या एसटी महामंडळाच्या १०० एकर जागेवर सार्वजनिक- खाजगी भागीदारीतून उभारले जाणार आहे.

---

## अल्पवयीन पोरीला बळजबरी विकलं, नशिबी ५ महिन्यांचा गर्भपात, सगळं समोर येताच बापाने...

**■जळगाव । प्रतिनिधी :**

जळगावमध्ये १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला विकून तिचे जबरदस्ती लग्न लावून दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे आपल्या मुलीसोबत घडलेल्या या प्रकारानंतर न्याय मिळावा म्हणून पोलीस तक्रार देऊनही कोणतीही कारवाई न झाल्याने या अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. मुलीला विकून तिचे लग्न लावून दिल्यानंतर ती पाच महिन्यांची गर्भवती राहिल्याचाही गंभीर प्रकार समोर आला आहे. दरम्यान, या हादरवून टाकणाऱ्या घटनेचा खुलासा झाल्यानंतर जळगावसह संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली आहे.



दरम्यान, या प्रकरणाबाबत अल्पवयीन मुलीच्या कुटुंबीयांनी तब्बल आठ दिवसांपासून तक्रार देऊनही रामानंदनगर पोलीस स्टेशन तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी गुन्हा दाखल केला नसल्याचा आरोप केला आहे. मुलीला विकत घेणारे तसेच तिच्या सोबत लग्न करणारे कोल्हापुर येथील कुटुंब मुलीला परत पाठवा तसेच आमचे पैसे सुद्धा द्या अशाप्रकारची धमकी देत होते. तर दुसरीकडे याबाबत पोलीसही तक्रार घेत नसल्याने या सर्व गोष्टींना कंटाळूनच मुलीच्या बापाने आत्महत्या केल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार जळगावातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला रोजगाराच्या बहाण्याने नेण्यात आले. तिथे तिच्याजवळचे पैसे आणि दागिने घेऊन तिला विकण्यात आले. विकून तिचा जबरदस्तीने विवाह करण्यात आला. आपल्या अल्पवयीन मुलीसोबत घडलेल्या प्रकाराचा धक्का बसल्याने तसेच विकत घेऊन लग्न करणारे कोल्हापूर येथील आठ ते दहा जण जीवे मारण्याची धमकी देत असल्याने या त्रासाला कंटाळून मुलीच्या बापानेही आत्महत्या केली आहे. मुलीच्या बापाने आत्महत्या केल्यानंतर हे संपूर्ण प्रकरण समोर आले आहे

आपल्या अल्पवयीन मुलीसोबत घडलेल्या प्रकाराचा धक्का बसल्याने तसेच विकत घेऊन लग्न करणारे कोल्हापूर येथील आठ ते दहा जण जीवे मारण्याची धमकी देत असल्याने त्रासाला कंटाळून मुलीच्या बापाने आत्महत्या केल्याची घटना आज घडली घडली आहे, या आत्महत्येच्या घटनेनंतरच हा प्रकार समोर आला आहे.

या प्रकाराबाबत तब्बल आठ दिवस उलटूनही रामानंद पोलीस तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील अधिकारी तक्रार घेत नसल्याने त्रासाला कंटाळून मुलीच्या बापाने गळफास घेतल्याचा धक्कादायक आरोप मयताचे भाऊ तसेच मुलाने केला आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करून आरोपींना जोपर्यंत अटक होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा पावित्रा कुटुंबियांनी घेतला आहे.

अल्पवयीन मुलींना रोजगाराच्या निमित्ताने घेऊन जाऊन त्यांना विकणे, त्यांचे परस्पर लग्न लावणे याचे मोठे रॅकेट असून याचा सीबीआयच्या माध्यमातून तपास करण्याची मागणीसुद्धा नातेवाईकांनी केली आहे.

सतरा वर्षीय मुलीचे जबरदस्तीने लग्न लावून दिल्यानंतर या काळात अल्पवयीन मुलगी पाच महिन्याची गर्भवती राहिल्याचेही समोर आले आहे. तिचा गर्भपातसुद्धा झाल्याची माहिती कुटुंबियांच्या वतीने देण्यात आली आहे. या प्रकाराला कंटाळून अल्पवयीन मुलगी घरी पळून आली. घरी आल्यानंतर तिने तिच्यासोबत घडलेली आपबीती कुटुंबीयांना कथन केली, हे ऐकून कुटुंबियांना मोठा धक्का बसला.

---

## अंबरनाथमध्ये राग मनात धरून बायकोसोबत अमानूष कृत्य



**■अंबरनाथ । प्रतिनिधी :**

आजकाल पती-पत्नीच्या नात्यात वितुष्ट येण्याच्या घटनांत फारच वाढ झालेली आहे. नाते टिवकता येत नसल्याने घटस्फोटांचेही प्रमाण चांगलेच वाढले आहे. दरम्यान, पत्नी-पत्नीच्या नात्यात संघर्ष निर्माण झाल्याने नंतर वेगवेगळ्या पद्धतीने सूड उगलवल्याचेही अनेक धक्कादायक प्रकार समोर आले आहेत. अशीच एक अजब आणि अचंबित करणारी घटना अंबरनाथमध्ये घडली आहे. आपल्याला सोडून गेल्याचा राग मनात धरून एका व्यक्तीने त्याच्या पत्नीवर थेट कोयत्याने वार केले आहेत. यात संबंधित महिला तसेच तिचा दुसरा पती जखमी झाले आहेत.

**नेमका वाद कशामुळे?**

अंबरनाथ पश्चिमेला राहणारे वैशाली पितळे आणि तिचा पती महेश पितळे हे शुक्रवारी २७ जून रोजी रात्री अंबरनाथ पूर्वेच्या शिवमंदीर रोडवरील एका ज्वेलर्सच्या दुकानात दागिने खरेदी करण्यासाठी आले होते. यावेळी वैशालीचा पहिला पती लाभेश प्रभाकर म्हात्रे हा रिक्षा घेऊन तिथे आला आणि त्याने वैशालीवर धारदार कोयत्याने हल्ला केला. लाभेशने वैशालीच्या दोन्ही हातावर आणि गुडघ्यावर वार करून लाभेशने तिला गंभीर जखमी केलं.

**नेमकं काय घडलं?**

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार पत्नी नेमकी कुणाची? या वादातून पहिल्या पतीने आपल्या सोडून गेलेल्या पत्नीसह तिच्या दुसऱ्या पतीवर कोयत्याने वार केले आहेत. अंबरनाथमध्ये घडली आहे. यामध्ये संबंधित महिला गंभीर जखमी झाली आहे. तर या महिलेचा दुसरा पतीही जखमी असून या दोघांवरही मुंबईच्या फोर्टीस रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**महिलेच्या दुसऱ्या पतीवरही कोयत्याने वार**

यावेळी वैशालीला वाचवण्यासाठी तिचा दुसरा पती महेश पितळे हा मध्ये पडला असता त्याच्याही हातावर लाभेश म्हात्रेने कोयत्याने वार केले. या हल्ल्यात जखमी झालेल्या वैशाली आणि महेश यांनी सुरुवातीला जवळच्या शोभा हॉस्पिटल आणि तिथून संजीवनी हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी धाव घेतली. मात्र तिथे प्राथमिक उपचार करून त्यांना मुलुंडच्या फोर्टिस हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारांसाठी त्यांना मुंबईच्या फोर्टीस हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आलं.

**आरोपीला अटक, चौकशी सुरू**

दरम्यान, या घटनेनंतर आरोपी लाभेश म्हात्रे हा स्वतःहून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात जाऊन पोलिसांना शरण आला. याप्रकरणी त्याच्या विरोधात शस्त्राने दुखापत करणे, शस्त्रास्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला पोलिसांनी अटक केली असून त्याची चौकशी सुरू असल्याची माहिती पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली आहे.

---

## पुण्यात भक्तांच्या मोबाईलचा ॲक्सेस मिळवला अन्...

**■पुणे । प्रतिनिधी :**

दिव्य शक्ती असल्याची बतावणी करणाऱ्या भोंदूबाबाच्या विरोधात पुण्यातील बावधन येथे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. एका बांधकाम व्यावसायिकाच्या तक्रारीवरुन पोलिसांनी ही कारवाई केली आहे. प्रसाद दादा उर्फ दादा उर्फ प्रसाद दादा भीमराव तामदार असं अटक केलेल्या २९ वर्षीय भोंदू बाबाचं नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बांधकाम व्यावसायिक असलेल्या ३९ वर्षीय व्यक्तीने बावधन पोलिस ठाण्यात भोंदूबाबाने तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार, भोंदू बाबांना त्याच्याकडे दिव्यशक्ती असल्याचा बनाव करत फिर्यादीला अनेक गोष्टी करण्यास भाग पाडले. आरोपीने दिलेल्या तक्रारीनुसार, फिर्यादीच्या मोबाइलमध्ये एक ॲप डाउनलोड करायला सांगितले होते. या ॲपच्या माध्यमातून त्याने त्याच्या मोबाइलचा ॲक्सेस मिळवला. मोबाईलवरील माहितीचा गैरवापर करत अश्लील कृत्य करण्यास तसेच मोबाईलवरील



माहितीचा गैरवापर करत अश्लील कृत्य करण्यास तसेच वेश्यागमनास प्रवृत्त केल्याचा गंभीर आरोप आहे. इतकंच नव्हे तर, फिर्यादीला प्रेयसीबरोबर अश्लील कृत्य त्याच बरोबर वेश्यागमन करण्यासही भाग पाडले आणि मोबाईल ॲपद्वारे ते बाबाने पाहिल्याचं फिर्यादित नमूद करण्यात आलं आहे. या भोंदू बाबाने आर्थिक फसवणूक केल्याचेही फिर्यादित सांगण्यात आलं आहे. फिर्यादी बरोबरच इतरही अनेकांना या बाबाने फसवणूक केल्याचं पोलिसांनी स्पष्ट केलंय. पोलीस अधिक तपास करत आहेत.

फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक केली असून, त्याच्यावर फसवणूक, माहिती तंत्रज्ञान कायदा, लैंगिक शोषणास प्रवृत्त करणे इत्यादी गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. दरम्यान, फियार्दीने दिलेल्या तक्रारीनुसार, बाबाने या सगळ्याच्या मोबदल्यात, मठाला मदत करण्याच्या बहाण्याने त्याने फार्यादीकडून १५ हजार रुपये उकळले असल्याचे समोर आले आहे. फसवणूक झाल्याचे लक्षात घेताच फिर्यादीने थेट पोलिसांत धाव घेतली आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# महाराष्ट्र टिकला, तरच...

पहिलीपासून विद्यार्थ्यांना तिसरी भाषा म्हणून हिंदीचा पर्याय देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. येत्या ५ जुलै रोजी गिरगाव चौपाटीवरून मोर्चा काढण्याचा निर्णय त्यांनी जाहिर केला. खरे तर, विद्यार्थ्यांना तिसरी भाषा म्हणून हिंदी अनिवार्य करण्याचा निर्णय हा केवळ एका प्रशासकीय फाईलवर उमटलेला शिक्का नाही, तर महाराष्ट्राच्या भाषिक अस्मितेवर झालेला हल्ला आहे. म्हणूनच राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा स्पष्ट शब्दांत, ठाम भूमिका घेतली आहे. 'हिंदीची सक्ती होऊ देणार नाही.', त्यांचा सूर हा भाषिक लढाईचा आहे. ही भूमिका कुठलीही राजकीय वाटू नये म्हणून त्यांनी स्पष्ट केले आहे की, गिरगाव चौपाटीवर निघणाऱ्या मोचाला कोणताही झेंडा नसेल. हा फक्त आणि फक्त मराठी माणसाचा मोर्चा असेल. शिक्षण विभागाच्या शुद्धिपत्रकाने जो निर्णय जाहिर केला आहे, तो फक्त एका भाषेची निवड नाही किंवा तो निव्वळ धोरण नाही, तर एका भाषेला म्हणजेच हिंदीला बळजबरीने पुढे रेटण्याचा कट आहे, हे राज ठाकरे यांनी निर्भीडपणे उघड केले आहे. तिसरी भाषा म्हणून 'पर्याय' दिला जातो, हे जरी शाब्दिक सत्य असले, तरी प्रत्यक्षात इतर भाषांसाठी अटी ठेऊन, हिंदीसाठी सर्व मार्ग खुले ठेवले जातात, हीच ती लबाडीची जागा आहे. थोडक्यात हा 'पर्याय' नसून 'दबाव' आहे आणि याच दबावाच्या मुळाशी आपण भिडायला हवे. हे राजकारण केवळ भाषा निवडीचे नाही, तर सांस्कृतिक वर्चस्व गाजवण्याचे आहे, हे राज ठाकरेंनी आपल्या भूमिकेतून स्पष्ट केले आहे. सीबीएसई शाळा, केंद्रीय यंत्रणा आणि प्रशासकीय मानसिकता हे सगळे एकाच दिशेने झुकलेले दिसते. ती दिशा म्हणजे 'हिंदी राष्ट्रवाद'. येथेच महाराष्ट्राला जागे व्हावे लागते. कारण ज्यांनी शिवबांची वाणी उराशी बाळगली, ज्यांनी तुकोबांची गाथा आणि फडयांमधून स्फूर्ती घेतली, त्या मातीत जर मातृभाषा उपेक्षित होऊ लागली, तर ते संपूर्ण संस्कृतीच्या गाभ्यालाच सुरुंग लावण्यासारखे आहे. राज ठाकरे यांनी उचललेला मुद्दा महत्त्वाचा आहे आणि पक्षीय मतभेद विसरून तो सर्वांनीच पुढे न्यायला हवा. मराठी मुलांनी शाळेत कोणती भाषा शिकावी हे ठरवताना स्थानिक संस्कृती, पालकांची भूमिका आणि समाजाची गरज यांचा विचार व्हावा लागतो. येथे मात्र उलटे घडते आहे. राज्य शिक्षण विभाग केंद्र सरकारच्या अजेंड्यावर काम करत आहे, असे स्पष्ट चित्र आहे. ज्यांना हिंदी नको, त्यांच्यासाठी संधी बंद केली जात आहे आणि ज्यांना ती पाहिजे, त्यांना वाट मोकळी करून दिली जात आहे. ही भाषा एकाधिकारशाहीची नवी पद्धत आहे. या निर्णयाचे परिणामही तितकेच गंभीर आहेत. शाळांमध्ये हिंदी सक्ती झाली, की मराठीचा वापर आपोआप कमी होतो. पालकांच्या नजरेतही मग 'हिंदीत शिक्षण घेतले, म्हणजे अधिक संधी' असा चुकीचा समज तयार होतो. हाच समज पुढे जाऊन मराठी शाळांची गळचेपी करतो. शिक्षकांची गरज कमी होते. साहित्य, नाट्य, कविता, लोकसंस्कृती या सगळ्यावर अंधार पडतो. एक पिढी आपल्या भाषेपासून तोडली गेली, की पुढच्या दोन पिढ्यांना त्या भाषेचा अर्थच उरत नाही. हे सगळे एका शुद्धिपत्रकाच्या नावाखाली होत असेल, तर तो 'शुद्ध' नव्हे, तर 'सूक्ष्म वार' ठरतो. शासनाच्या निर्णयाचा सर्वांत खोल परिणाम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर होईल. गावाकडची शाळा ही मातृभाषेतील शिक्षणाची शेवटची माळ आहे, जेथे शिकणे हे फक्त ज्ञानाचे साधन नसून जीवनाशी नाते सांगणारे अनुभवविश्व असते. तेथे जर दुसरी, तिसरी भाषा म्हणून आधीच इंग्रजीचा ताण असतो, त्यात आता हिंदीची सक्ती केली गेल्यास तर त्या विद्यार्थ्यांचं शिक्षण केवळ भाषांच्या जंजाळात अडकून बसणार आहे. हे विद्यार्थी ना हिंदी व्यवस्थित आत्मसात करू शकणार, ना मराठीवर भर देऊ शकणार. त्यांच्या भाषिक विचारसरणीचा पाया गढूळ होईल, त्यांचा अभ्यास तुटकपणे होईल आणि त्यांचे मन शिक्षणापासूनच दुरावेल. शिक्षणासोबतच स्थानिक शिक्षक, ग्रामीण लेखक, मराठी माध्यमातील पुस्तके आणि गावागावातल्या ज्ञान संस्कार केंद्रांचा आधार गळून पडेल. ही प्रक्रिया इतकी सूक्ष्म आणि दीर्घकालीन आहे की लक्षात येईपर्यंत एक संपूर्ण पिढी मातृभाषेपासून दूर गेलेली असेल. एका बाजूला शहरात ट्युटर्स, खासगी क्लासेस, डिजिटल ॲप्स यामुळे काही मर्यादित नुकसान होते, पण गावात मात्र ही भाषा सक्ती म्हणजे थेट शैक्षणिक संधींना मारक ठरणारी, गळा दाबणारी व्यवस्था ठरते. म्हणूनच हा निर्णय म्हणजे गावातल्या विद्यार्थ्यांच्या मनावर, शिक्षणावर आणि संस्कृतीवर होणारी छुपी घुसखोरी आहे. या निर्णयाविरोधात मराठी माणसाने उभे राहणे हे त्याच्यासाठी फार महत्त्वाचे ठरणार आहे. जर आज आपण उठून उभे राहिलो नाही, तर उद्या आपल्या नातवंडांच्या शाळांमध्ये मराठी शिकवा म्हणून मोर्चा काढावा लागेल. मराठी ही केवळ भाषा नाही ती विचारांची, संस्कारांची आणि स्वाभिमानाची ओळख आहे. ती जर अभ्यासातून, बोलण्यातून, लेखनातून हद्दपार झाली, तर आपण एक भाषा हरवून बसू. शिवाय त्यातून आपले अस्तित्वही गमावले जाईल. संस्कृती टिकली, तर महाराष्ट्र टिकेल. महाराष्ट्र टिकला, तरच भारताचा खरा गौरव जपला जाईल.

# निवडणूक आयोगाला स्वतःला सिद्ध करण्याची संधी!




काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पाच मुख्य मुद्दे निवडणूक आयोगाबद्दल उपस्थित केले आहेत. जे महाराष्ट्रात झाले तेच आगामी बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप करण्याची भीती काँग्रेसने व्यक्त केली आहे. त्यामुळे निवडणूक आयोग संशयाच्या भोवऱ्यात आहे. आयोगाने राहुल गांधींना चर्चेचे निमंत्रण दिले आहे. या चर्चेतून हे संशयाचे धुके दूर करणे आणि स्वतःला सिद्ध करण्याची संधी आयोगाकडे चालून आली आहे. आणीबाणीच्या पन्नाशीत हे होत आहे, हाही काळाचा महिमाच आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवर दाटलेलं संशयाचे धुके कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस दाट होत चालले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला खुले पत्र लिहून काही प्रश्न उपस्थित केले. त्याला निवडणूक आयोगाने उत्तर देण्याऐवजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी लेख लिहून प्रत्युत्तर दिले.

फडणवीसांनी उत्तर देण्याची तशी काही गरज नव्हती, कारण प्रश्न भाजपला किंवा फडणवीसांना केले गेले नव्हते. तरीही त्यांनी स्वतःहून निवडणूक आयोगाचे वकीलपत्र घेतले आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणूक कशी निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने झाली हे सांगण्याचा प्रयत्न केला. यानंतर काँग्रेसकडून फडणवीसांना लेखाने उत्तर दिले गेले नाही, हे बरे झाले. पण काँग्रेसी नेते शांत बसले नाही. त्यांनी आपापल्या पातळीवरून समाचार घेतलाच.

राहुल गांधींनी आता पुन्हा एकदा महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मॅच फिक्सिंग झाल्याचा आरोप केला. यावेळी त्यांनी फडणवीसांच्याच विधानसभा मतदारसंघाचा दाखला दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघात निवडणुकीआधी शेवटच्या पाच महिन्यांत ८ टक्के मतदार वाढले. तर मतदानाच्या दिवशी काही बूथवर २० ते ५० टक्के मतदार वाढले. राहुल गांधी सातत्याने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबद्दल प्रश्न उपस्थित करत आहेत.

फडणवीसांच्या मतदारसंघाबद्दल त्यांनी म्हटले आहे की, बूथ स्तरावर असलेले अधिकारी बीएलओ यांनी तक्रार केली आहे की, अज्ञात व्यक्तींनी मतदान केले आहे. हजारो मतदार असे आहेत ज्यांच्या पत्त्यांची ओळख पटत नाही. प्रसारमाध्यमांनी हे मतदार शोधून काढण्याचा प्रयत्न केला, त्यांना संबंधित पत्त्यांवर ते मतदारच सापडलेले नाही. निवडणूक आयोगाने नेमलेले बीएलओ तक्रार करतात, प्रसारमाध्यमे बोगस मतदार असल्याचे रिपोर्ट करतात, तरीही निवडणूक आयोगाचे मौन कायम आहे. निवडणूक आयोग आणि सरकार या सगळ्या प्रकारावर पडदा टाकण्याचाच प्रयत्न करत आहे.

असे करून ते कबुलीच देत नाही का? एक प्रकारे ही मतांची चोरीच आहे. असाही सवाल राहुल गांधींनी केला. म्हणूनच आम्ही मशीन रीडेबल डिजिटल मतदार याद्या आणि मतदानाच्या दिवशीचं सीसीटीव्ही फुटेज प्रसिद्ध करण्याची मागणी करत आहोत, असंही राहुल गांधींनी म्हटलं आहे. सोशल मीडियावरून त्यांनी आयोगाला पुन्हा एकदा सवाल केले आहेत. त्यांच्यावर पलटवार करण्याचे आद्यकर्तव्य आपलेच असे मानून पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीसांनीच उत्तर दिले. राहुल गांधींनी यावेळी सोशल मीडियावर सवाल केले, त्यांना फडणवीसांनी सोशल मीडियावर प्रत्युत्तर दिले.

ह्यमहाराष्ट्रातील पराभव तुम्हाला रोजच त्रास देत आहे. हे आम्ही समजू शकतो. मात्र किती दिवस असे हवेत बाण मारत राहाणार? महाराष्ट्रात असे २५ हून अधिक मतदारसंघ आहेत, जिथे ८ टक्क्यांहून अधिक मतदार लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान वाढले आहेत आणि त्यातील काही ठिकाणी काँग्रेसचे उमेदवारही विजयी झाले आहेत. दक्षिण-पश्चिम मतदारसंघाला लागून असलेल्या पश्चिम नागपूर मतदारसंघात ७ टक्के मतदार वाढले, ज्यांची संख्या २७ हजार ६५ होती आणि येथे काँग्रेसचे विकास ठाकरे विजयी झाले.

उत्तर नागपूरमध्ये ७ टक्के मतदार वाढले तिथे काँग्रेसचे डॉ. नितीन राऊत विजयी झाले. पुण्यातील वडगाव शेरी मतदारसंघात १० टक्के मतदार वाढले आणि येथे शरद पवार गटाचे बापूसाहेब पठारे जिंकले. मालाडमध्ये ११ टक्के मतदार वाढले आणि येथे काँग्रेसचे अस्लम शेख विजयी झाले. मुंब्रा मतदारसंघात ९ टक्के मतदार वाढले आणि येथे शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड विजयी झाले. अशी उदाहरणे मुख्यमंत्री फडणवीसांनीही प्रत्युत्तरात दिली आहेत.

दुसरीकडे, वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनीही संध्याकाळी पाचनंतर वाढलेल्या ७६ लाख मतदारांची माहिती निवडणूक आयोगाकडे मागितलेली आहे. त्यांनी यासंबंधी मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेत बाजूही मांडली. मात्र मुंबई उच्च न्यायालयाने प्रकाश आंबेडकरांची याचिका फेटाळून लावली. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरीफ यांच्या खंडपीठाने दिवसभर याचिका ऐकून घेतली.

याचिका फेटाळताना कोटार्ने म्हटले की, याचिका ऐकून आमच्या कामकाजाचा वेळ वाया गेला. उच्च न्यायालयाने कोणत्या आधारावर याचिका फेटाळली हे अजून स्पष्ट झालेले नाही. न्यायालयाचा संपूर्ण निकाल आल्यानंतरच त्यांच्या आक्षेपांवर वंचित नेते प्रकाश आंबेडकर बोलतील. मात्र ही याचिका फेटाळून न्यायालयाने विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी पाचनंतर वाढलेली ७६ लाख मते आली कुठून याचेही उत्तर जेजमेंटमध्ये येण्याची आपेक्षा आहे.

निवडणूक आयोगाने राहुल गांधींना चर्चेचे निमंत्रण दिल्याची माहिती आहे. १२ जून रोजीच आयोगाने राहुल गांधींना पत्र पाठवून त्यांच्या आक्षेपावर चचेर्ची तयारी दाखवली आहे. त्यामुळे वाढलेल्या मतांची गोळाबेरीज आयोग कशी सादर करणार हे पाहावे लागणार आहे. तत्पूर्वी त्यांनी लोकसभा विरोधी पक्षनेत्यांना पाठवलेल्या पत्रात नियमांचे कसे पालन केले याचे वर्णनच केले आहे. भारतीय संसदेने तयार केलेल्या निवडणूक कायद्याद्वारे, त्याच्या नियमांद्वारे आणि वेळोवेळी निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार देशात निवडणुका काटेकोरपणे घेतल्या जातात.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक प्रक्रिया विधानसभा मतदारसंघ पातळीवर केंद्रीकृत आहे. यामध्ये निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले १ लाख १८६ हून अधिक बीएलओ, २८८ निवडणूक नोंदणी अधिकारी, १३९ सामान्य निरीक्षक, ४१ पोलीस निरीक्षक, ७१ खर्च निरीक्षक आणि २८८ निवडणूक अधिकारी आणि महाराष्ट्रात राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांनी नियुक्त केलेले १ लाख ८ हजार २६ बूथ लेव्हल एजंट यांचा समावेश आहे. यामध्ये काँग्रेसचे २८ हजार ४२१ एजंट आहेत. त्यामुळे मतांची चोरी होऊच शकत नाही, असा राग आयोगाने आळवला आहे.

राहुल गांधी आयोगाच्या निमंत्रणाला सकारात्मक प्रतिसाद देतील आणि त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना आयोग समोरासमोर उत्तर देईल, इथपर्यंत ही लढाई आली आहे. मात्र मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीवरच काँग्रेसने सवाल उपस्थित केलेला आहे. याचा प्रतिवाद करताना फडणवीसांनी केलेली चलाखी कोणाच्याच नजरेतून सुटलेली नाही. राहुल गांधींचा साधा प्रश्न होता की, मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवड प्रक्रियेतून सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना वगळण्याचा निर्णय का झाला.

त्याऐवजी गृहमंत्र्यांची निवड करून मोदी सरकारने आपल्या मर्जीतील लोकांनाच या पदावर आणण्याचा घाट घातला आहे का? मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवड प्रक्रियेत तीन सदस्य आहेत. पंतप्रधान, विरोधी पक्षनेता आणि सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांना या प्रक्रियेतून बाहेर काढून गृहमंत्र्यांची एंट्री मोदी सरकारने करून घेतली आहे. त्यामुळे तीन सदस्यांच्या समितीत एकट्या विरोधी पक्षनेत्याच्या मताला काय किंमत राहणार आहे?

यानंतर निवडणूक आयोगाने नुकताच एक बदल केला आहे. निवडणुकीचे फुटेज आणि डेटा, छायाचित्रे जतन करण्याचा कालावधी आता ४५ दिवसांवर आणण्यात आला. जर कोणी निवडणुकीसंबंधी याचिका दाखल केली नाही तर निकाल जाहीर झाल्यानंतर ४५ दिवसांनी डेटा नष्ट केला जाऊ शकतो. आणीबाणीला आता ५० वर्षे झाली आहेत. आणीबाणीची पार्श्वभूमी देखील निवडणूक आणि उच्च न्यायालय राहिलेली आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना निवडणूक गैरव्यवहारात दोषी ठरवून सहा वर्षांसाठी सार्वजनिक पद ग्रहण करण्यास अपात्र ठरवले होते. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालात गैरव्यवहाराचा आरोप झाला त्याचा निकाल १२ जून १९७५ साली देण्यात आला. यामुळे देशात अराजक माजेल याचा अंदाज आल्यामुळे इंदिरा गांधींनी भारतीय संविधानानुसार देशात आणीबाणी लागू केली. सध्याचे केंद्र आणि राज्यातील भाजप सरकार हा दिवस संविधान हत्या दिवस म्हणून काही वर्षांपासून पाळत आहे.

मात्र ज्या पद्धतीने आता निवडणूक आयोग आणि सरकारी यंत्रणा काम करत आहेत, ते पाहून वेगळ्या आणीबाणीची गरज नाही असा विरोधकांचा असलेला आरोप खरा वाटण्यास वाव मिळत आहे. विरोधकांचे हे आरोप खोडून काढण्याची चांगली संधी आता निवडणूक आयोगाला मिळाली आहे. राहुल गांधींसोबतच्या चचेर्चा ते यासाठी उपयोग करतील अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

# 'नाटो'ची वाटचाल (अ)सुरक्षिततेकडे!



जगातील अनेक देशांवर राज्य करणाऱ्या, अनेक राष्ट्रांना लुटून स्व-उत्कर्ष साधणाऱ्या आणि उपभोगवादी प्रवृत्तींनी झपाटलेल्या देशांना त्यांची सुरक्षा कमकुवत असल्याचे वाटू लागले आहे. म्हणूनच 'नाटो'च्या छत्राखालील या देशांनी आता जीडीपीच्या थेट पाच टक्के खर्च संरक्षणावर करण्याचा निर्णय घेतला आहे. ही वाटचाल (अ) सुरक्षिततेकडेच जाणारी आहे.

इंग्रजांनी भारतावर दीडशे वर्षं राज्य केले, इतरही अनेक देशांवर झडप घालून त्यांना लुटले. जगातील एवढ्या देशांवर त्यांचे वर्चस्व होते की, 'इंग्लंडच्या साम्राज्यावरील सूर्य मावळत नव्हता', असे म्हटले गेले. अशाच प्रकारे युरोपातील पोर्तुगीज, डच, फ्रेंच आदी देशांनीही लहान-मोठ्या अनेक देशांवर कब्जा मिळवला. त्यांची बेसुमार लूट केली. मानवी हक्कांचे सर्रास उल्लंघन करून त्यांचे शोषण केले. त्या त्या देशातील मौल्यवान साधन-संपत्तीवर हक्क सांगून ती आपल्या ताब्यात घेतली. जगाच्या इतिहासातील ही काळी पाने पुन्हा आठवण्याचे कारण म्हणजे नेदरलँडच्या हेगमध्ये झालेली नाटो शिखर बैठक. या बैठकीत नाटो सदस्यांनी मोठा निर्णय घेऊन संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. जीडीपीच्या तब्बल पाच टक्के वाटा संरक्षणासाठी देण्याची घोषणा भुवया उंचावण्याबरोबरच अनेक अर्थाने महत्त्वाची आहे. त्याचा नक्कीच परिणाम जगाच्या राजकारण, अर्थकारण, संरक्षण, व्यापार, भूराजकीय, परराष्ट्र संबंध अशा विविध क्षेत्रांवर होणार आहे.

नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन (नाटो) हे दुसऱ्या महायुद्धा पश्चात जन्मलेलं अपत्य. शीतयुद्धाच्या काळात असुरक्षेने झपाटलेल्या युरोपियन देशांना फारच अस्वस्थ केले. परिणामस्वरूप लष्करी स्वरूपाच्या या संघटनेला आकार देण्यात आला. आपापल्या हिताची काळजी करत २५हून अधिक देशांनी या करारावर स्वाक्षरी केली. ह्यएकावरही हल्ला झाला तर तो सर्वांवरह्ल या मुख्य उद्देशाने नाटो संघटित झाली. पाहता पाहता संख्या वाढली. आता नाटोचे तब्बल ३२ सदस्य देश आहेत. नाटो देशांची शिखर परिषद ही विविध जागतिक विषयांवर, अडीअडचणी आणि समस्यांवर चर्चा करण्यासाठी, त्या सोडविण्यासाठी आणि आगामी काळातील धोके ओळखून त्यावर उपाययोजना तसेच त्याला प्रतिबंध घालण्यासाठीचा कृती आराखडा तयार करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची समजली जाते.

२४-२५ जून रोजी हेगमध्ये झालेल्या शिखर परिषदेला अमेरिका, जर्मनी, स्पेन, ब्रिटन, इटली, पोलंड, बेल्जियम, स्लोव्हाकिया यासह सर्व सदस्य देशांचे प्रमुख उपस्थित होते. नेहमीप्रमाणे अमेरिकेचा वरचष्मा यात होता. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प कधी काय बोलतील? किंवा कधी ते कुणाला काय धमकावतील? याचा काही नेम नाही. त्यामुळे या परिषदेत नेमके काय घडते? याकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या होत्या. नाटोमधून बाहेर पडण्याचा इशारा गेल्या वेळी ट्रम्प यांनी दिला होता. त्यामुळे अन्य सदस्यांच्या पोटात गोळा आला होता. ट्रम्प यांची आता भूमिका काय आहे? याचीच सर्वांना उत्सुकता होती. अपेक्षेप्रमाणे त्यांनी नाटो सदस्यांना दम दिला. त्याची परिणती एका मोठ्या ठरावात झाली. पुढील दहा वर्षांत प्रत्येक देशाने त्यांच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) तब्बल पाच टक्के खर्च संरक्षणावर करायचा. यातील साडेतीन टक्के खर्च हा शस्त्रास्त्रांचे उत्पादन व निर्मिती, सैन्य वाढविणे यावर आणि उर्वरित दीड टक्के खर्च हा सायबर सुरक्षा, संरक्षण पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी करायचा आहे. सद्यस्थितीत नाटो सदस्य जीडीपीच्या दोन टक्के निधी देत आहेत. तसेच, अमेरिका ही नाटो करारातील पाचव्या कलमासाठी प्रतिबद्ध असल्याचे ट्रम्प यांनी सांगितल्याने सर्व सदस्यांना हायसे वाटले. कारण, नाटो सदस्यावर हल्ला झाला तर अमेरिका प्रतिहल्ला चढवेल की नाही? याबाबत साशंकता व्यक्त केली जात होती. त्यातही ट्रम्प यांचा अंदाज येणे साऱ्या जगालाच अवघड झाले आहे. आता त्यांनीच खुलासा केल्याने नाटो सदस्यांचा जीव भांड्यात पडला आहे.

नाटो परिषदेत ट्रम्प आणि युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांची भेट झाली. ५० मिनिटे त्यांनी विविध बाबींवर चर्चा केली. अमेरिका आता युक्रेनला शस्त्रास्त्रे देण्यास तयार झाला आहे. यामुळे रशियाच्या अडचणी वाढणार आहेत. युक्रेनही नाटोचा सदस्य होण्यासाठी आक्रमक होताच रशियाने त्याच्यावर घाव घातला आणि संघर्ष सुरू झाला. अमेरिकेचा पाठिंबा जर युक्रेनला मिळाला तर रशियाला ही बाब चांगलीच महागात पडू शकते. परिणामी, रशिया काय करेल? याची उत्सुकता सर्वांना असेल.

नाटोच्या ठरावाकडे सर्वांगाने पाहणे आवश्यक आहे. या ठरावाचे वृत्त झळकताच भारतीय शेअर बाजारात संरक्षण उत्पादक कंपन्यांच्या शेअरमध्ये तेजी पहायला मिळाली. आगामी काळातही या कंपन्यांना सुगीचे दिवस असतील, असे अनुमान आहे. म्हणजेच गुंतवणूकदार संरक्षण क्षेत्रातील कंपन्यांकडे अधिकाधिक आकृष्ट होतील. युद्धग्रस्त पश्चिम आशिया आणि रशिया-युक्रेन यांच्यातील संघषार्मुळे जगभरात संरक्षण क्षेत्राला कमालीचे महत्त्व प्राप्त झाले आहे. असो.

सद्यस्थितीत नाटो सदस्यांना संरक्षणासाठी जीडीपीतील दोन टक्क्यांचा निधी खर्च करतानाही धाप लागत आहे. महागाई, बेरोजगारी यासह अनेक समस्या आ-वासून उभ्या राहत असल्याने आर्थिक आघाडीवर त्यांची चांगलीच दमछाक होत आहे. आता थेट पाच टक्के निधी कुठून आणि कसा खर्च करायचा या चिंतेने ते ग्रस्त झाले आहेत. स्पेनच्या अध्यक्षांनी तर स्पष्टपणे तसे परिषदेतच बोलून दाखविले. ट्रम्प यांनी त्यांचा चांगलाच समाचार घेतला. अमेरिका दोन टक्के खर्च करते आणि अन्य सदस्य देश करीत नाही हीच ट्रम्प यांची खंत आहे. म्हणूनच ते नाटो सदस्यांवर आगपाखड करतात. आता निधी वाढवूनही जर त्यांनी संरक्षणावर भर दिला नाही तर कदाचित अमेरिका ठोस निर्णय घेईल, असा सज्जड इशारा देण्यात आला आहे.

रशियाला लागून असलेला फिनलँड हा देश दोन वर्षांपूर्वीच नाटोचा सदस्य झाला. युक्रेनप्रमाणे आपल्यावरही आक्रमण होईल म्हणून तो या गोटात आला. आता त्यालाही पाच टक्के निधी देणे अवघड वाटते आहे. त्यामुळे ठरावाची अंमलबजावणी खरोखरच होईल का? याबाबत संदिग्धता आहे.

सुरक्षेसाठी विविध अस्त्र आणि शस्त्रस्त्रांची निर्मिती केली जात आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे तर अत्यंत विध्वंसकारी क्षेपणास्त्रे विकसित करण्यात आली आहेत. त्याचा प्रत्यय इस्त्रायल-हमास, इस्त्रायल-इराण, रशिया-युक्रेन, भारत-पाकिस्तान यांच्यातील 'ऑपरेशन सिंदूर' यामध्ये आलाच आहे. त्याचबरोबर अणू आणि हायड्रोजन बॉम्बचेही कोलीत अनेकांकडे आहेच. नाटो देशांच्या पैशांमधून यापुढील काळात आणखी संहारक आयुधे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शस्त्रास्त्र निर्मितीची मोठी स्पर्धा पहायला मिळण्याची चिन्हे आहेत. ही अहमहमिका एवढ्यावरच थांबेल का? हा खरा प्रश्न आहे.

ज्या युरोपियन देशांचा आजवरचा इतिहास हा केवळ संघर्ष, नरसंहार, आक्रमण, वसाहतवाद, विस्तारवाद, युद्ध, असुरक्षितता यांनी भरगच्च आहे त्यांना आणखी सुरक्षेसाठी काहीतरी करावेसे वाटणे तसे स्वाभाविकच म्हणता येईल. म्हणूनच नाटोच्या माध्यमातून ते स्वतःला संरक्षण सज्ज करीत आहेत. सुरक्षेसाठी अणुबॉम्बसह अनेक घातक क्षेपणास्त्र तयार करूनही शांतता किंवा सुरक्षितता लाभत नसल्याचे मात्र वास्तव आहे. त्यामुळे आणखी भयानक आयुधे तयार करून नक्की काय साध्य होणार आहे? हे सुरक्षेकडून असुरक्षेकडे जाणेच नाही का? नाटो सदस्य नक्की काय साध्य करू पाहत आहेत? दिवसागणिक असुरक्षेची छाया गडद होते आहे. 'त्यांच्यात युद्ध सुरू झाले, आपल्याला काय करायचे किंवा जाऊ द्या' असे म्हणण्याचे दिवस जागतिकीकरणामुळे राहिलेले नाहीत. पश्चिम आशियात उसळलेल्या उद्रेकाने तेलाच्या पुरवठ्यासह जागतिक व्यापारावरच संकटाचे मळभ दाटून आले. त्यातच आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) सारख्या अत्याधुनिक तंत्राचा वापर संरक्षण क्षेत्रात वाढत आहे; मात्र, जगाचे हित नेमके कशात आहे? काय केले म्हणजे शांतता लाभेल? असुरक्षिततेची भावना लोप पावेल? सुख आणि समृद्धीची वाट सापडेल का? हे सारे प्रश्न अनुत्तरितच राहत आहेत. नाटो शिखर परिषदेच्या सांगतेनंतर या प्रश्नांची धार आणखीनच वाढलेली आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

# पहिल्या अंतराळवीराच्या आठवणी जाग्या होणे स्वाभाविकच




'सारे जहाँ से अच्छा...' हे काव्यमय उत्तर होते, राकेश शर्मा यांचे. ४१ वर्षांपूर्वी त्यांनी जेव्हा अवकाशात झेप घेतली, तेव्हा तिथून भारत कसा दिसतो, हा प्रश्न त्यांना तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विचारला होता. त्यांनी या प्रश्नाला दिलेले वरील उत्तर हे त्यांच्या अंतराळ मोहिमेइतकेच संस्मरणीय ठरले. चार दशकांनंतर, बुधवारी, शुभांशू शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या दिशेने झेप घेतली तेव्हा भारताच्या पहिल्या अंतराळवीराच्या आठवणी जाग्या होणे स्वाभाविकच. या मोहिमेवर जाताना शुक्ला यांनी केलेले विधान राकेश शर्मा यांच्या काव्यमय उत्तरासारखे नसले, तरी ते तितकेच महत्त्वाचे आहे. 'हा प्रवास केवळ आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या दिशेने नाही, तर भारताच्या मानवी अवकाश मोहिमेच्या दिशेनेही आहे,' हे शुक्ला यांचे वक्तव्य भारताच्या भावी अवकाश मोहिमांकडे अंगुलिनिर्देश करणारे आहे. शुक्ला यांची अवकाश झेप ही भारताच्या मानवी अवकाश मोहिमांच्या युगाची सुरुवात म्हणावी लागेल. तब्बल चार दशकांनंतर त्यांच्या रूपाने भारताला दुसरा अंतराळवीर मिळाला असला, तरी यापुढील अंतराळवीरांसाठी आता इतका काळ प्रतीक्षा करण्याची गरज भासणार नाही; कारण येत्या वर्षभरातच 'गगनयान' ही भारताची पहिलीवहिली अवकाश मोहीम कार्यान्वित होईल. त्या मोहिमेची पूर्वतयारी म्हणजे शुभांशू शुक्ला यांची आत्ताची मोहीम. 'ऑक्सिऑम ४' या अमेरिकी मोहिमेत भारताचा सहभाग केवळ शुक्ला यांच्यापुरता मर्यादित नाही, तर अंतराळात भारताकडून प्रयोगही केले जाणार आहेत. भारतीय अवकाश संशोधन संस्थेतर्फे (इस्त्रो) एकूण सात प्रयोग केले जाणार असल्याने ही मोहीम भारतासाठी महत्त्वाची आहे. अवकाश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारतीय शास्त्रज्ञांनी आणि तंत्रज्ञांनी आपली क्षमता यापूर्वी अनेकदा सिद्ध केली आहे. उपग्रहांपासून प्रक्षेपकांच्या विकसनापर्यंत आणि चांद्र मोहिमांपासून मंगळयानापर्यंतच्या मोहिमा भारताने यशस्वी करून दाखविल्या आहेत. एकाच वेळी शंभराहून अधिक उपग्रहांचे प्रक्षेपण करण्याचा विक्रमही 'इस्त्रो'ने केला आहे. चंद्राच्या अंधार असलेल्या भागात यशस्वीपणे यान उतरविण्याचा मानही भारताने मिळविला आहे. मानवाला अवकाशात पाठविण्यासाठीची मोहीम राबविण्यासाठी सुरुवातीला २०२२चे उद्दिष्ट 'इस्त्रो'ने ठेवले होते; परंतु करोना साथरोगासह अन्य कारणांमुळे ते साध्य करण्यात यश आले नाही. आता त्यासाठी २०२७चे लक्ष्य ठेवण्यात आले असून, त्यासाठीची तयारी पुढील वषार्पासून सुरू होईल. शुभांशू शुक्ला यांचा समावेश असलेल्या 'ऑक्सिआम ४' या सध्याच्या मोहिमेचा भारताला उपयोग होऊ शकेल. मानवी अवकाश मोहीम राबविण्यासाठीचे अनेक धडे यातून मिळतील. ऑक्सिऑम ४ मोहिमेला 'इस्त्रो'ने अर्थसाह्य करण्याचा एक हेतू हाही आहे. अमेरिका, भारत, पोलंड आणि हंगेरी या चार देशांचे अंतराळवीर या मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात चौदा दिवस राहणार असून त्या काळात साठ वेगवेगळे प्रयोग होणार आहेत. भारतासह तीस देशांकडून हे प्रयोग होतील. सूक्ष्मगुरुत्वाकर्षणात बियाण्यांचा वापर, बीजांकुर, प्रतिकूल तापमानातील सूक्ष्मजीवांचे जगणे, नील-हरित जीवाणू, अंतराळातील सूक्ष्म शैवाल आदी भारताकडून होणाऱ्या प्रयोगांची निष्पत्ती ही भविष्यातील अंतराळ मोहिमांसाठी उपयुक्त ठरेल. अवकाश विज्ञान समजून घेण्यासाठीही ते महत्त्वाचे असणार आहे. अंतराळात राहण्यासाठीची क्षमता विकसित करण्यापासून तेथील जैवविज्ञान प्रयोगांसाठी संधी निर्माण करण्यापर्यंतची उद्दिष्टे 'गगनयान' मोहिमेने समोर ठेवली आहेत. शुक्ला यांच्यासह प्रशांत बालकृष्णन नायर, अजित कृष्णन, अंगद प्रताप हे 'गगनयान'मध्ये सहभागी होतील. शुक्ला यांचा सध्याच्या मोहिमेतील अनुभव 'गगनयान'च्या वेळी उपयुक्त ठरेल. २०३०पर्यंत अवकाश स्थानक विकसित करण्याचेही भारताचे उद्दिष्ट आहे. त्याच्या पूर्ततेसाठीही सध्याची मोहीम महत्त्वाची ठरेल. शुक्ला यांच्या अवकाश झेपेशी या सर्व गोष्टी अशा रीतीने जोडल्या गेल्या आहेत. अवकाश तंत्रज्ञानाला आलेले सामरिक स्वरूपही याबाबत महत्त्वाचे ठरते. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि तत्कालीन सोव्हिएत रशिया यांच्यात अवकाश तंत्रज्ञानाची स्पर्धा होती. कालांतराने ती कमी झाली असली, तरी संपली नाही. गेल्या काही वर्षांत अशी स्पर्धा पुन्हा नव्याने सुरू झाली असून, भारतासह चीन, जपान, युरोपीय संघ आदीही त्यात उतरले आहेत. चंद्र, मंगळ यांच्या दिशेने नव्या मोहिमा हे देश आता आखत आहेत. चंद्रावर माणूस पाठविणे ही नवीन बाब नसली, तरी पुन्हा एकदा मानवी मोहिमा सुरू होत आहेत. आकांक्षापुढती गगन ठेंगणे... या उक्तीची प्रचिती देणाऱ्या या मोहिमांतून विश्वाबद्दलचे नवे आकलन होऊ शकते. ते मिळविण्यात भारताचेही योगदान असणार, ही समाधानाची बाब.

## कच्च्या केळ्याचे वडे

**साहित्य** – चार कच्ची केळी, अर्धा चमचा मोहरी, चिमूटभर हिंग, आठ ते दहा कढीपत्ता पानं, पाव चमचा हळद, चार ते पाच हिरव्या मिरच्या, एक इंच आलं, मीठ, कोथिंबीर, एक कप बेसन, पाव चमचा हळद, अर्धा चमचा लाल मिरची पावडर, एक चिमूट खायचा सोडा, तेल.

**कृती** – प्रथम चार कच्ची केळी कुकरमध्ये तीन ते चार शिट्या काढून उकडून घ्या आणि नंतर त्याचं साल काढून, कुस्करून घ्या. एका कढईत तेल घालून मोहरी, हिंग, कढीपत्त्याची फोडणी करा. नंतर त्यात हळद, आले, मिरची खर्डा आणि कुस्करलेलं केळं घाला. आता त्यात मीठ घालून ते वाफवून घ्या. कोथिंबीर घाला आणि तयार भाजी थंड होऊ द्या. दुसऱ्या एका भांड्यात बेसन, मीठ, हळद, तिखट आणि सोडा घाला. थोडं पाणी घालून भज्यासारखं पीठ तयार करा. तयार भाजीची गोळे करा आणि पिठात घोळवून तेलात फ्राय करून घ्या. वडे झाले की हिरवी चटणी आणि टोमॅटो सॉस बरोबर सर्व्ह करा.



## सुंदर त्वचेसाठी मुलतानी माती



**मुलतानी मिट्टी किंवा मुलतानी माती भारतात शेकडो वर्षांपासून त्वचेच्या सौंदर्यासाठी आणि निरोगीपणासाठी वापरली जात आहे. जेव्हा कॉस्मेटिक्स बाजारात नव्हतीच, तेव्हापासून भारतीय महिला आपल्या त्वचेसाठी ही माती वापरत आल्या आहेत. बाजारातील महागडी आणि काहीवेळा त्वचेला अपाय होऊ शकणारी क्रीम्स किंवा पॅक वापरण्यापेक्षा ही माती निर्धकपणे त्वचेसाठी वापरता येते आणि महागड्या कॉस्मेटिक्सच्या तुलनेत ती स्वस्त असतेच; पण त्यापासून कोणताही अपाय होण्याचा धोका नसतो.**

**चेहऱ्यावरील** सुरकुत्या, पुरळ, मुरमे, काळे डाग, ब्लॅक हेड, व्हाईट हेड, व्रण यांसारख्या अनेक कारणांसाठी ही माती अत्यंत सुरक्षित आणि उपयुक्त आहे. त्यामुळे ती वापरून त्वचेवर काय चमत्कार घडतो हे अनुभवण्यास काहीच हरकत नाही.

या मातीचे काही फायदे प्रथम समजून घेऊ. या मातीत मॅग्नेशियम क्लोराईड असते, ज्यामुळे पुटकुळ्या आणि त्वचेवरील डाग कमी होतात. त्वचा तेलकट असेल तर ही माती त्वचेतील अनावश्यक जादा तेल शोषून घेते आणि नवीन पिंपल्स येण्यास अटकाव करते. या मातीपासून बनविलेले फेसपॅक त्वचा स्वच्छ बनवितात तसेच धूळ, तेल व त्वचेवरील मृत पेशी हटवतात. त्वचेला लाली येत असेल, तर ती कमी करण्यासाठी आणि व्रण कमी करण्यासाठी तसेच त्वचेला शांत आणि सूदिंग इफेक्ट देण्यासाठीही ही माती अतिशय उपयुक्त ठरते. तसेच त्वचेवर पिगमेंटेशन होत नाही आणि त्वचा टॅन होण्यापासूनही सुटका होते.



या मातीपासून घरच्या घरीच फेसपॅक बनवून ते वापरता येतात. त्वचा तेलकट असेल तर मुलतानी माती, गुलाबपाणी आणि चिमूटभर हळद घालून त्याची पातळ पेस्ट करावी आणि चेहरा व मानेवर लावावी. डोळ्याभोवती लावू नये. हा पॅक वाळू द्यावा व नंतर पाण्याचे तोंड स्वच्छ धुवावे. पॅक लावल्यानंतर जास्त बोलू नये अथवा चेहऱ्याची जास्त हालचालही करू नये.

पिंपलचे डाग त्वचेवर असतील तर मातीत ताज्या टोमॅटोचा रस, चिमूटभर चंदन पावडर आणि चिमूटभर हळद घालून पेस्ट बनवावी आणि ती चेहऱ्यावर लावावी. डोळ्याखालची काळी वर्तुळे जाण्यासाठी माती, दही आणि पुदीन्याच्या पानाच्या पेस्टसह कालवावी आणि लावावी. हा पॅक अर्धा तास चेहऱ्यावर ठेवून नंतर कोमट पाण्याने तोंड धुवावे.

विशेष म्हणजे त्वचेला कोणताही विकार नसेल आणि त्वचा चांगलीच असेल तरी ती अधिक चांगली, मऊ तसेच चमकदार होण्यासाठी या मातीचा लेप थोड्याशा तेलासह चेहऱ्यावर लावावा.

ही माती ओळखायची कशी, असा एक प्रश्न येतो. मात्र, ती वास आणि रंगावरून सहज ओळखता येते. मातीचा रंग फिकट पिवळसर असतो, तर वास ताज्या चिखलासारखा असतो. या मातीपासून बनविलेले पॅक बाजारात मिळतात, मात्र शक्यतो मातीच विकत आणून वरीलप्रमाणे आवश्यकतेनुसार मिश्रण करून केलेले पॅक स्वस्त पडतात. तसेच त्यापासून अपाय होण्याची भीतीही राहत नाही.

नॉर्मल त्वचा असेल तर मातीत दूध आणि बदामाची थोडी पूड घालून पॅक करावा आणि चेहऱ्यावर लावावा. पुटकुळ्या येत असतील, तर त्या जाण्यासाठी या मातीत कडूनिंब आणि कापूर घालून गुलाबपाणी घालावे व ते मिश्रण त्वचेवर लावावे. हे मिश्रण आठवड्यातून एकदाच लावावे.

## आपल्यासाठी योग्य डायट प्लान

**दिवसभरात कामाच्या भानगडीत महिला आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. अनेक लोक योग, व्यायाम किंवा वॉक करत असल्यातरी एवढं पुरेसे नाही. आपल्याला योग्य आहाराची गरज देखील आहे. आहार योग्य नसल्यास शरीरात पोषक तत्त्वांची कमी राहते, ज्यामुळे आजाराला आमंत्रण मिळतं. अशात वर्किंग वूमन असो वा हाऊस वाइफ परफेक्ट डायट आपल्याला एनर्जी प्रदान करेल.**

**ब्रेकफास्ट:** सकाळी आठच्या सुमारास नाश्ता करावा. ब्रेकफास्टमध्ये सांजा, ऑम्लेट, कॉर्न फ्लेक्स, ओट्स, म्यूसली यातून आपल्या आवडीप्रमाणे पदार्थ निवडणे योग्य ठरेल.

**मिड-मॉर्निंग:** अकरा वाजताच्या सुमारास अंडं, फ्रेंच टोस्ट, अंडं-टोस्ट, व्हेज सूप, लहान सँडविच, धिरडं, मिनी व्हेज पराठा किंवा 1 वाटी फ्रूट चाट घेणे योग्य ठरेल.

**लंच :** दुपारी दीडच्या सुमारास वरण-भात, भाजी-पोळी, कोशिंबीर दही किंवा ताक घ्यावे.

**नून स्नॅक्स :** मिल्क शेक, मूठभर रोस्टेट चणे किंवा दाणे, मुरमुरे, स्प्राऊटेड धान्य घेता येईल.

**डिनर :** आठ वाजता रात्रीचे जेवण करत त्यात चिकन, मटण, पनीर, डाळ, भाज्या, सॅलड, दही किंवा ताक सामील करता येईल.

पूर्ण डायटमध्ये सकाळी आणि रात्रीच्या जेवणात फुलके दोन आणि तेही मल्टीग्रेनने तयार केलेल्या असल्यास उत्तम. आपण भाज्या, डाळ आणि सॅलड भरपूर प्रमाणात खाऊ शकतात.



**हे देखील लक्षता ठेवा**

- आहारात पोषक तत्त्व जसे व्हिटॅमिन्स, झिंक, प्रोटीन, कॅल्शियम इतर सामील करावं. स्वत:ला हायड्रेड ठेवण्यासाठी दिवसात १० ग्लास पाणी पिण्याची सवय असावी. आहारात लिंबू पाणी, नारळ पाणी, ग्रीन टी, ज्यूस सामील करावे.
- मधे चहा-कॉफी घेण्याची सवय असल्यास त्याचे प्रमाण कमी असावे, तसेच त्यात साखरेचे प्रमाणदेखील कमी असावे.
- तसेच ब्रेकफास्ट सोडून कधीच एनर्जी फिल करू शकणार नाही म्हणून कितीही व्यस्त असला तरी नाश्ता करणे गरजेचे आहे.

## कमी रक्तदाब नियंत्रणात आणण्यासाठी एक घरगुती साधा उपाय



**कमी रक्तदाबाला 'हायपोटेन्शन' सुद्धा संबोधले जाते. जेव्हा रक्तदाबाचे मापन करणाऱ्या मशीनमध्ये ९०/६० एमएमएचजी किंवा त्यापेक्षाही कमी रक्ताचे निदान होते, त्यास 'हायपोटेन्शन' मानले जाते. अशा परिस्थितीत व्यक्तीच्या रक्तदाबाचे प्रमाण फार कमी झालेले असते. तेव्हा चक्कर येणे, थकवा जाणवणे, मळमळणे, श्वास घेण्यास अडथळे निर्माण होणे, त्वचा तेलकट होणे यांसारखी लक्षणे समोर येतात.**

**आल्याचे सेवन**
**'हायपोटेन्शन'साठी लाभदायक**

▮आल्याचे सेवन आरोग्यासाठी लाभदायक ठरते. आल्यामध्ये अँण्टी इंफ्लेमेट्री, अँण्टी बॅक्टेरियल, अँण्टी ऑक्सिडेंटशिवाय आणखीही काही पोषक तत्त्व असतात.

▮आल्यामधील या पोषक तत्त्वांमुळे सूज कमी करण्यास तसेच सर्दी-खोकला कमी करण्यास फायदेशीर ठरते.

▮सकाळी उठल्यावर रिकाम्यापोटी आल्याचे पाणी प्यायल्याने रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते.

▮आल्याचे पाणी प्यायल्याने रोगप्रतिकार शक्तीही चांगली होती. पित्त झाल्यासही आल्याचे पाणी प्यायल्याने आराम मिळतो.

**मिठाचे पाणी**
**'हायपोटेन्शन'साठी लाभदायक**

˘ मिठाचे पाणी प्यायल्याने रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. पण मिठाचे प्रमाण नेमके किती असावे, यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

˘ मिठामध्ये सोडियमचे गुण असल्यामुळे रक्तदाब वाढण्यास मदत होते.

˘ एक ग्लास पाण्यात अर्धा चमचा मीठ एकत्र करून प्यायल्याने रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. पण मीठ शरीराला तेवढाच घातक पदार्थ आहे. म्हणून एकदा डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## लहान मुलांच्या नाकातून रक्तस्राव होत असेल तर 'हे' करा

**उन्हातून आल्यावर काही लहान मुलांमध्ये नाकातून रक्तस्राव होतो. याला घोळणा फुटणे असे म्हणतात. यात नाकाच्या पुढच्या भागातल्या नाजूक रक्तवाहिन्या (केशवाहिन्यांचे जाळे) उष्णतेने फुगून फुटतात व रक्त येते. काही वेळा अतिरिक्त दाब किंवा रक्ताच्या कर्करोगात पण घोळणा फुटतो. म्हणून वारंवार असा त्रास होत असल्यास तज्ज्ञास दाखवावे.**



**प्रथमोपचार**

रक्तस्राव सुरू असताना जास्त हालचाल न करता बसून राहावे. डोके पुढे झुकलेले ठेवावे. म्हणजे रक्त गिळले जाणार नाही. अँड्रेनॅलिन स्प्रे उपलब्ध असल्यास नाकात एकदा फवारा मारावा. याने रक्तवाहिन्या आकसून रक्तस्राव थांबतो. वाटल्यास ५ मिनिटांनी परत एकदा मारावा. मात्र अतिरिक्त दाबाच्या रुग्णांना हा उपचार करू नये.

नाकाचा पुढचा भाग हाताच्या बोटाने २-५ मिनिटे दाबून धरावा. याने रक्तवाहिन्यांतून रक्त येणे बंद होते. नाकाला व गालांना थंडगार पाणी किंवा बर्फ लावल्याने रक्तवाहिन्या आकुंचन पावून रक्तस्राव थांबायला मदत होते. रक्तस्राव थांबल्यावर उशी घेऊन उताणे निजून राहावे.

**कारणे**

▮नाकाला जखम होणे
▮कष्टाचं काम
▮उच्च रक्तदाब
▮उंचीवरच्या प्रदेशात जाणे
▮नाक फार जोरानं शिंकरणे

**नाकातून रक्त आल्यास काय करावे**

▮खाली बसावे

▮थोडेसे पुढे झुकावे म्हणजे रक्त हे आपल्या घशात जाणार नाही

▮थंड, ओला कपडा आपल्या नाकाखाली धरावा म्हणजे आपल्या नाकातील रक्तवाहिन्या आकुंचित होऊन रक्तस्राव थांबेल.

▮रक्त हे एकाच नाकपुडीतून येत असेल तर, त्या नाकपुडीच्या वरच्या भागात घट्ट दाबून धरावे.

▮दोन्ही नाकपुड्यांतून रक्त येत असेल तर, आपल्या नाकपुड्या किमान दहा मिनिटे दाबून धराव्यात.

▮तरीही रक्तस्राव चालूच राहिल्यास, आणखी दहा मिनिटे दाब द्यावा.

▮रक्तस्राव हा नाकाला थेट झालेल्या जखमेमुळं झाला असेल तर, केवळ हलकाच दाब द्यावा.

▮जोरदार रक्तस्राव चालूच राहिल्यास किंवा नाकातून वारंवार चालू राहिल्यास, एखाद्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## आजमावून प्या जास्वंदीचा चहा

**जास्वंदीच्या** फुलाचे महत्त्व आपल्याकडे मोठे आहे. गणपती बाप्पाचे हे फूल आवडते आहेच, पण त्याशिवाय हे फूल उत्तम औषधी म्हणूनही वापरले जात असते. जास्वंदीची फुले आणि पाने खोबरेल तेलामध्ये कढवून हे तेल केसांना लावल्याने अकाली पांढरे झालेले केस पुनश्च काळे होतात, तसेच केसगळती थांबून केसांची चांगली वाढ होते. जास्वंदीची फुले वापरून बनवलेला चहा किंवा काढा देखील आरोग्याच्या दृष्टीने अतिशय उत्तम समजला जातो. जास्वंदीची फुले भारतामध्ये बहुतेक ठिकाणी सहज उपलब्ध असून, हा चहामध्ये अनेक पौष्टिक तत्त्वे असून, यामध्ये कॅफीनचे प्रमाण नगण्य असते. या चहाच्या सेवनामुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात राहून कोलेस्टेरॉलचे प्रमाणही नियंत्रणात राहते. या चहाने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढत असून, चयापचय शक्तीदेखील सुधारते.

'हिबिस्कस टी' किंवा जास्वंदीचा चहा बनवण्यासाठी जास्वंदीच्या फुलांचा वापर केला जात असून, या चहाला फुलांप्रमाणेच लाल रंग येतो. या चहाची चव काहीशी आंबटसर असून, हा चहा गरम किंवा गार पिता येतो. या चहामध्ये अँटी ऑक्सिडंट्स आणि 'क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणावर आहे. या चहामध्ये लोहाची मात्रा ही मुबलक असून कॅफीनचे प्रमाण अतिशय कमी असल्याने फिटनेस शौकिनांसाठी या चहाचे सेवन लाभदायक ठरते. यामध्ये पोटॅशियम आणि 'अ' जीवनसत्त्वही आहे. या कारणास्तव या चहाचे



सेवन दररोज करणे चांगले. अनेक देशांमध्ये आता या जास्वंदीचा चहा ग्रीन टीला पर्याय म्हणून सेवन केला जात आहे. हा चहा बनवण्यासाठी खास जास्वंदीच्या चहाच्या टी बॅग्ज बाजारामध्ये मिळतात, त्यांचा वापर केला जाऊ शकतो. त्याशिवाय हा चहा घरी तयार करण्यासाठी दोन कप ताजी जास्वंदीची फुले किंवा अर्धा कप वाळवलेल्या जास्वंदीच्या फुलांची पावडर, आठ कप पाणी, पाव कप मध, तीन मोठे चमचे लिंबाचा रस इतक्या साहित्याची गरज आहे. जर चहा बनवण्यासाठी ताजी फुले वापरली जाणार असतील, तर या फुलांमधील तुरा काढून टाकावा.

त्यांतर ही फुले धुवून घेऊन आठ कप पाण्यामध्ये घालून हे पाणी उकळावे. पाण्याला उकळी आल्यानंतर गॅस बंद करून पाण्याच्या भांड्यावर झाकण ठेवावे. हे झाकण पंधरा मिनिटे राहू द्यावे. त्यानंतर या पाण्यामध्ये लिंबाचा रस आणि मध घालून चांगले मिसळावे आणि मग हा चहा गाळून घ्यावा. हा चहा गरम किंवा थंड करून पिण्यास द्यावा. या चहाचे सेवन गर्भवती महिला, कर्करोगाचे उपचार घेणारे रुग्ण, कमी रक्तदाब असणाऱ्या व्यक्तींनी कमी प्रमाणात करावे.

## कम्फर्ट व्हर्सेस फॅशन, दोन्ही कसे मिळवाल?



**'आरामदायीपणा सर्वात महत्त्वाचा' हे सर्वश्रुत आहे, परंतु जेव्हा स्त्रियांच्या फॅशनचा विषय येतो, तेव्हा एखादी गोष्ट निवडताना केवळ या एकाच गोष्टीचा विचार करून चालत नाही. गेल्या अनेक वर्षांपासून अॅथलेअरचा ट्रेंड वाढत असताना, स्त्रिया दोन्ही गोष्टी मिळवून देण्याची १०० टक्के शक्यता असल्याचे सिद्ध करत फॅशनविरुद्ध कम्फर्ट असे वादविवादाचे अनेक मार्ग शोधत आहेत. जेव्हा त्या आरामदायी हा शब्द ऐकतात तेव्हा, त्यामध्ये लेगिंग्ज आणि घाम नेहमीच प्रथम गोष्टी असतात, परंतु जेव्हा फॅशनचा विषय येतो, तेव्हा, फॅशनचे समर्थक नि:संशयपणे अधिक सर्जनशील होतात.**

आपण २१ व्या शतकात वास्तव्य करत आहोत, जेथे स्त्रिया सतत समाजात मिसळत असतात, वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनशैली आहेत आणि ही वेळ आपण आपल्या कपड्यांसह अधिक आरामदायक आणि फॅशनेबल निवड करण्याची. चांगली बातमी अशी आहे की, अलीकडच्या काळात लाऊंजवेअर खूप वर्षांनी आले आहेत. केवळ त्यामध्ये भरपूर पर्याय म्हणून नाहीत तर ते सैल, आरामदायी असे कपडे खरोखरच ट्रेंडमध्ये आहेत. आता आपल्या मैत्रिणींसह दिवसातून जास्तीत जास्त वेळा बाहेर फिरायला जाऊ शकता, तुम्ही आरामदायी वाटू शकेल ते ही विशेष काही न बदलता. जर आपण त्यांना 'जॉगर्स' म्हटले तर, तुम्ही त्यांना धावपट्टीवर स्वेटपॅन्टस म्हणून देखील घालू शकता. आपण ड्रेसिंगच्या सुवर्णयुगात राहत आहोत - एका आळशी मुलाचे फॅशन स्वर्ग. म्हणून, व्हिस्कोस त्याच्या गुणधर्मांसह उच्च श्वासोच्छ्वास, संपूर्ण जैव-विकृती आणि पर्यावरण अनुकूल अशा श्रेणीतील पसंतीची निवड ठरली आहे. व्हिस्कोसपासून बनवलेल्या कपड्यांचे हे सॉफ्ट टेक्स्चर आहे, ज्यामुळे त्यांना सहजपणे पोशाख करणे सोपे होते आणि आपल्याला पाहिजे असलेल्या शैलीत वापरणे सोपे होते. फॅब्रिकची फ्लुएडीटी शरीरावर ड्रेप करण्यास अधिक मदत करते, त्यामुळे फॅब्रिक अंगावर चमकण्यास मदत होते. कपड्यांसह लेअरिंग अत्यंत सोपे आहे, कारण याचा पोत कपड्याचा गोळा होऊ देत नाही. हे कोणत्याही फॅशनिस्टांसाठी असणे आवश्यक आहे. उज्ज्वल रंग आणि पेस्टल्स रंग ट्रेन्डमध्ये आहेत, त्यामुळे फॅब्रिकची रंगीत होणारी क्षमता आकर्षक बनवते.

## थकवा दूर करण्यासाठी वापरा ग्रीन टी फेसपॅक



चेहऱ्यावर चमक आणण्यासाठी घरगुती फेसपॅक सर्वोत्तम ठरतो. जेव्हा स्कीन थकलेली किंवा डल वाटत असेल तेव्हा तांदूळ आणि ग्रीन टीचा घरी तयार केलेला फेसपॅक स्किनला रिलॅक्स होण्यास मदत करेल. बघू कसा तयार करायचा हा पॅक...

◆ **सामग्री :** लिंबू, ग्रीन टी, २-३ थेंब पेपरमिंट किंवा टी ट्री तेल.

◆ **कृती :** एका वाडग्यात २ चमचे तांदळाचे पीठ घेऊन त्यात १/४ चमचा लिंबाचा रस मिसळा. त्यात ताजी ग्रीन टी मिसळा. क्रीमसारखं होईपर्यंत मिसळत राहा. आता या पॅकमध्ये ३ ते ४ थेंब पेपरमिंट किंवा टी ट्री तेलाचे मिसळा.

◆ **लावण्याचा विधी :** आपला चेहरा कोमट पाण्याने धुऊन घ्या. मग चेहरा आणि मानेवर पॅक लावा. २० मिनिटानंतर पॅक धुऊन टाका. चेहरा पुसून मॉइश्चरायझर लावा.

## जिरे आरोग्यासाठी लाभदायक



**जिरे** एक मसल्यातील पदार्थ आहे. जेवणाला रुचकर चव आणण्यात जिऱ्याचा वाटा मोठा असतो. जिरे केवळ खाण्यासाठी मर्यादित नाही, तर आपल्याला आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. जिऱ्याचा उपयोग औषध म्हणून केला जात आहे. जिऱ्यामध्ये लोह, मॅग्नेशिअम, कॅल्शियम, फायबर, झिंक आदींची जास्त मात्रा असते. मेक्सिको, भारत, नार्थ अमेरिका या देशांत जिऱ्याचा जास्त वापर केला जातो. शरीरातील अनावश्यक चरबी बाहेर काढण्यास जिरे मदत करते. तसेच जिरेपूड खाल्ल्यानंतर एक तास काहीही खाऊ नका.

- दह्यात भाजलेल्या जिऱ्याचे चूर्ण घालून खाल्ल्यास डायरियावर आराम मिळतो.
- जिऱ्यात लिंबाचा रस आणि मीठ घाला. त्यामुळे उलटीसारखे वाटणे, मळमळणे यावर आराम मिळेल.
- जिऱ्यात थोडे व्हिनेगर घालून खाल्ल्यास उचकी बंद होते.
- जिऱ्यात गूळ घालून त्याच्या गोळ्या बनवा. त्या मलेरियावर लाभदायी ठरतात.
- एक चिमूटभर कच्चे जिरे खाल्ल्याने ॲसिडीटीपासून सुटका होते.
- मधुमेह नियंत्रित ठेवण्यासाठी एक छोटा चमचा जिरे दिवसातून दोनदा पाण्यासोबत घ्या. नक्कीच फायदा होईल.

## या कारणांमुळे लीक होतो फोनमधील डेटा, या चुका टाळाच

**आजकाल डेटा लीकच्या घटना वारंवार ऐकण्यात येत असतात. अनेक प्रकारे डेटा लीक होत आहे. कधी फेसबुकचा डेटा लीक होतो, तर कधी कोणत्यातरी शॉपिंग साइटचा. एवढेच नाही, तर तुमच्या स्मार्टफोनचा खासगी डेटा जसे की फोटो, व्हिडीओ किंवा कोणतीही गोपनीय फाइलही लीक होऊ शकते. याचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे डेटा लीक झाल्यानंतर तुमची वैयक्तिक माहिती आणि ई-मेल आयडी, पासवर्ड, मोबाइल नंबर इत्यादी हॅकर्सपर्यंत पोहोचतात. नंतर हॅकर्स फोरमसारख्या डार्क वेबवर डेटा विकला जातो किंवा याच्या मदतीने वैयक्तिक ब्लॅकमेलही करता येते. तुम्हीही अँड्रॉइड स्मार्टफोन वापरत असाल तर तुमचा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी तुम्ही काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे, जेणेकरून भविष्यात तुम्हाला कोणतीही अप्रिय घटना टाळता येईल. चला जाणून घेऊया.**

### या कारणांमुळे डेटा लीक होतो

कोणत्या चुकांमुळे तुमचा वैयक्तिक डेटा लीक होतो हे माहीत असणे महत्त्वाचे आहे. अनेकदा असे दिसून येते की, आपण आपले कोणतेही वैयक्तिक फोटो, व्हिडीओ किंवा फाइल्स आणि पासवर्ड आपल्या मित्र आणि नातेवाईकांसोबत शेअर करतो. जर त्यांनी तुमचा डेटा आणखी एखाद्या व्यक्तीकडे हस्तांतरित केला, तर तुमचा डेटा लीक होऊ शकतो.

तसेच बऱ्याच वेळा आम्ही घाईघाईने किंवा लक्ष न देता प्रामाणिक स्त्रोतांकडून थर्ड पार्टी ॲप्स इन्स्टॉल करणे टाळावे. यामुळे ॲप्स स्पायवेअरने लोड केले जाऊ शकतात आणि तुमची वैयक्तिक माहिती हॅकर्सच्या समोर आणू शकतात.

### डेटा लीक टाळण्यासाठी या पद्धती फॉलो करा

तुमच्या स्मार्टफोनला डेटा लीकपासून वाचवण्याचा सर्वात सोपा आणि महत्त्वाचा मार्ग म्हणजे तुमचा फोन लॉक ठेवणे. यासोबतच ॲपलॉकच्या मदतीने फोनमधील ॲप्स विशेषतः गॅलरी आणि फाइल मॅनेजर सुरक्षित ठेवा. ॲप फक्त गूगल प्ले स्टोरवरून इन्स्टॉल करा. तसेच ॲप स्थापित करण्यापूर्वी त्याचे रेटिंग आणि रिव्ह्यू नक्की वाचा.

थर्ड पार्टी ॲप्स वापरणे टाळा. बऱ्याच वेळा या ॲप्समध्ये स्पायवेअर आणि मालवेअर असतात, जे तुमचा फोन स्कॅन करत राहतात आणि तुमची वैयक्तिक माहिती हॅकर्सपर्यंत



पोहोचवण्यासाठी बॅकग्राऊंडमध्ये काम करतात. फोनमध्ये फक्त आवश्यक ॲप इन्स्टॉल करण्याचा प्रयत्न करा आणि जेव्हा शंका असेल तेव्हा लगेच ॲप काढून टाका. फोनवरील कोणत्याही अज्ञात लिंकवर क्लिक करू नका. हॅकर्स किंवा स्कॅमर अनेकदा ई-मेल किंवा एसएमएसद्वारे मालवेअरने भरलेल्या लिंक्स पाठवतात. लिंक क्लिक करताच तुमच्या फोनची हेरगिरी सुरू होते.

# अधिकृत शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या समायोजनेसाठी पालिकेची धडपड

## दिव्यात शिक्षण विभागाची ९ पथके तैनात, महापालिका शाळांमध्ये दुपारचे सत्रही भरवणार

**■ठाणे** : ठाणे शहरातील अनधिकृत शाळांविरोधात महापालिकेच्या शिक्षण विभागाने कठोर पावले उचलली आहेत. या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे इतर शाळांमध्ये समायोजन करण्यासाठी शिक्षण विभागाने दिवा भागात ९ पथके तैनात केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

या पथकांच्या माध्यमातून दिव्यातील ज्या ६५ अनधिकृत शाळांमध्ये तपासणी करण्याबरोबरच शाळा बंद करण्याबाबतच्या सूचना देणे, त्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना अधिकृत शाळेत प्रवेश घेण्याबाबत समजवून सांगणे, तसेच शाळा प्रवेश घेत असताना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी व कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी सहकार्य व्हावे, या दृष्टीने हे पथक काम करणार आहे. ठाणे महापालिका हद्दीत आजच्या घडीला ८१ अनधिकृत शाळा आहेत. त्यातील ६५ शाळा या एकट्या दिवा भागात आहेत. त्यातील ३२ शाळांचे पाणी कनेक्शन पालिकेने खंडित केले आहे. तसेच या शाळांविरोधात थेट पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दुसरीकडे अनधिकृत शाळांमधील विद्यार्थ्यांचे अधिकृत शाळेत समायोजन करण्याबाबत पालिकेने यापूर्वीच सुरू केल्या आहेत. त्यानुसार दिव्यातील १७ अधिकृत शाळांच्या संस्थाचालकांसोबत बैठका घेण्यात आल्या असून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत आवाहन देखील करण्यात आले आहे.




### शिक्षकांची जुळवाजुळव सुरू

दिवा परिसरातील ६ इमारतीत ठाणे पालिकेच्या ७ शाळा भरत आहे. या शाळा सकाळच्या सत्रात भरत आहेत. त्यामुळे या शाळा आता दुपारच्या सत्रात देखील सुरू करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. तसेच दुपारच्या सत्रात शाळा सुरू करण्यासाठी आवश्यक शिक्षकांची जुळवाजुळव करण्यात येत असून विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांची नेमणूक तासिका शिक्षक अथवा कशी करता येईल, याची चाचपणी देखील करण्यात येत असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली.

### दिव्यात अनधिकृत ६५ शाळा

सध्या इंग्रजी शाळांना चांगली मागणी असल्याने नावाजलेल्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रत्येक पाल्याला आपल्या मुलाला टाकणे शक्य होत नाही. त्यामुळे याचाच फायदा घेत झोपडपट्टी भागात अशा शाळांचे प्रमाण वाढत आहे. दिव्यात आजच्या घडीला ६५ शाळा या बेकायदा असल्याचा दावा या संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

**बेकायदा शाळांना अभय**

अनधिकृत शाळांच्या संदर्भात ४० ते ४५ वेळा तक्रारी करण्यात येऊनही पालिकेच्या शिक्षण विभागाला याचे गांभीर्यच नसल्याने शिक्षण विभागाकडून कोणत्याच प्रकारची कारवाई या शाळांवर झालेली नाही. मात्र पुन्हा या शाळा सुरु झाल्या असून ही संख्या कमी होण्याऐवजी आता वाढल्याचे दिसून येत आहे. ठाणे महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळेच या बेकायदा शाळांना अभय मिळत असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

### अधिकृत शाळेकडे पालकांची देखील पाठ

अनधिकृत शाळांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी हे मध्यमवर्गीय असून बहुतांश पालक हे मजुरीचे काम करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पालक सभांना व अनधिकृत शाळेत प्रवेश घेण्याबाबत त्यांच्याकडून हवा तसा प्रतिसाद मिळत नाही. अधिकृत शाळेची फी ही अनधिकृत शाळेपेक्षा अधिक असल्याने पालकांनी देखील त्याकडे पाठ फिरवली असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे आता या अनधिकृत शाळांतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी पालिकेचा शिक्षण विभागाने पावले उचलली आहेत.

### दिव्यातील अधिकृत शाळांचा बंद


ठाणे दिव्यातील अनधिकृत शाळा बंद होत नसल्याने दिव्यातील अधिकृत शाळा १ जुलैपासून बेमुदत बंद ठेवण्याचा इशारा इंडिपेन्डन्ट स्कूल मॅनेजमेंट असोसिएशन या संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. ठाणे महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत दरवर्षी शहरातील अनधिकृत शाळांची यादी प्रसिद्ध केली जाते. या शाळांमध्ये पाल्यांनी आपल्या मुलांना शिक्षणासाठी पाठवू नये, असे देखील सांगितले जाते. महापालिका हद्दीत आताच्या घडीला मोठ्या प्रमाणात अनधिकृत शाळा असून यामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा आकडा अधिकचा असलेला दिसून आला आहे. त्यामुळे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दिव्यातील अधिकृत शाळा १ जुलैपासून बेमुदत बंद राहणार असल्याचा दावा संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

# 'मुंबईतली १३०० कोटींची जमीन अदानींना अवघ्या ५७.८६ कोटींना दिली'

**■मुंबई** : मुंबईमधील मौक्याच्या ठिकाणी असलेला एक अत्यंत महत्त्वाचा भूखंड आता धारावीच्या पुनर्विकासाच्या नावाखाली कवडीमोल दरात अदानी समुहाला दिला जात असल्याची माहिती समोर आली आहे. नव्या प्रकरणामध्ये मुंबईतील तब्बल १३०० कोटी रुपये किंमत असलेली जमीन अदानी समुहाला अवघ्या ५७ कोटी ८६ लाखांमध्ये देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा आरोप 'आपली लोक चळवळी'ने केला असून हा सारा व्यवहार म्हणजे मोठा जमीन घोटाळा असल्याचं सांगत या प्रकरणी न्यायालयात धाव घेण्याची तयारी असल्याचं सांगण्यात आलं आहे.

### कशासाठी दिली जातेय ही जमीन?

मुंबईतील अनेक ठिकाणच्या जागा कवडीमोल दरात अदानी समुहाला दिल्या जात असतानाच आता यामध्ये कुर्ला मदर डेअरीच्या जागेचाही समावेश होत असल्याचा आरोप केला जात आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत धारावीतील अपात्र रहिवाशांचे मुंबईत अन्यत्र पुनर्वसन केले जाणार आहे. भाडेतत्वावरील घरांच्या माध्यमातून त्यांना घरे दिली जाणार असून या घरांची बांधणी अदानी समुहाच्या 'नवभारत मेगा डेव्हल्पर्स प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीकडून (एनएमडीपीएल) केली जाणार आहे. त्यानुसार धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या (डीआरपी) माध्यमातून मुंबईतील विविध ठिकाणची १२०० एकर जागेची मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली होती.



**१५ हजार रुपये पर स्वेअरफूट दर असताना ६३२ रुपये दराने दिली जमीन**

सध्या कुल्यार्तील निवासी जागेचा दर १५ हजार रुपये प्रतिचौरस फूट असताना ही जमीन केवळ ६३२ रुपये प्रतिचौरस फूट दराने देण्यात आली आहे. आजघडीला बाजारभावानुसार या जमिनीची किंमत १३०० कोटी रुपये आहे. असे असताना ही जागा केवळ ५७.८६ कोटीत रुपयांत देण्यात आल्याचा आरोप ह्यआपली लोक चळवळीह्वचे कार्यकर्ते किरण पैलवान यांनी केला आहे. तांत्रिकदृष्ट्या ही जमीन डीआरपीकडे हस्तांतरित झाली असून ही जमीन डीआरपीच्या नावे राहणार आहे. जमिनीसाठी अदानीच्या कंपनीने पैसे भरले असून जागेचा वापर याच कंपनीकडून होणार आहे. यातून अदानीलाच फायदा होणार आहे, असेही त्यांनी सांगितले आहे.

### कुल्यार्तील नागरिक आक्रमक

मागणीनुसार डीआरपीला मुलुंडसह अन्य काही ठिकाणच्या जागा देण्यात आल्या आहेत. यात कुल्यार्तील मदर डेअरीच्या २१ एकर जागेचा समावेश आहे. ही जागा डीआरपीला हस्तांतरित करण्यात आली आहे. मात्र ही जागा देण्यास कुलार्वासियांचा प्रचंड विरोध असून यासाठी आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या जागेवर उद्यान साकारण्याची मागणी कुलार्वासियांची केली आहे. मात्र त्यांच्या या मागणीकडे काणाडोळा करीत सरकारने ही जागा डीआरपीला हस्तांतरित केली आहे. या जागेचा वापर आता एनएमडीपीएलकडून अपात्र धारावीकरांच्या घरबांधणीसाठी केला जाणार आहे. आता ही जागा कवडीमोल दरात अदानीला आंदण दिल्याचा आरोप करीत कुलार्वासीयांनी केला असून ते याविरोधात आक्रमक झाले आहेत.

### उच्च न्यायालयात धाव घेणार

धारावीबाहेरील जागा रेडीरेकनरच्या २५ टक्के दरात देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मात्र बाजारभावानुसार १३०० कोटी रुपयांची जमीन ५७.८६ कोटी दरात देण्यात आली आहे. त्यास 'आपली लोक चळवळ'ने आक्षेप घेतला आहे. निविदेमधील कोणत्या अटी-शतीर्नुसार अदानीच्या प्रकल्पासाठी कमी दरात जागा दिली याचे स्पष्टीकरण राज्य सरकारने जनतेला द्यावे, अशी मागणीही पैलवान यांनी केली आहे. हा मोठा जमीन घोटाळा असून याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेणार आहोत. त्यादृष्टीने विचार सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या प्रकरणावर अदानी समुहाकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया नोंदवण्यात आलेली नाही.

# पीओपीच्या गणेश मूर्तीसाठी दीर्घकालीन धोरण आखणार



ह्लहे धोरण दीर्घकालीन पर्यावरणीय उपाययोजनांचा समावेश करणारे असावे आणि ते परंपरेशी सुसंगत असावे. तसेच हे कायदेशीर चाचणीही टिकवून ठेवू शकेल इतके सक्षम असावे,ह्व असे फडणवीस यांनी बैठकीत सांगितले.

**■मुंबई** : मोठ्या प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) गणेश मूर्तीसाठी पर्यावरणपूरक आणि पारंपरिकतेशी सुसंगत असे दीर्घकालीन धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिले.

गणेशोत्सवात नैसर्गिक जलस्रोतांमध्ये पीओपी मूर्तीचे विसर्जन हे वादग्रस्त ठरले आहे, कारण प्लास्टर ऑफ पॅरिसला प्रदूषक मानले जाते. सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे करण्याबाबत आयोजित उच्चस्तरीय बैठकीत फडणवीस यांनी सांस्कृतिक परंपरा आणि पर्यावरण संवर्धन यामधील संतुलन राखण्याचेमहत्त्व अधोरेखित केले.

मुंबई उच्च न्यायालयाने पीओपी मूर्तींच्या विसर्जनाबाबत काही निर्देश दिले होते. त्यानंतर राज्य सरकारने राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाकडून एक अभ्यास करण्याचे काम दिले. आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांनी सादर केलेल्या अहवालात मोठ्या मूर्तीसाठी खोल समुद्रात विसर्जनाच्या शक्यतेचा अभ्यास करण्याची शिफारस केली आहे.

दरम्यान, फडणवीस यांनी महापालिका अधिकाऱ्यांना विशेषतः समुद्रकिनाऱ्यांवर विसर्जनानंतर प्रभावी स्वच्छता मोहीम राबवण्याचे तसेच मूर्ती बनवण्यासाठी पर्यावरणपूरक साहित्य आणि नैसर्गिक रंगांचा वापर प्रोत्साहित करण्याचे निर्देश दिले. या बैठकीस उपस्थित असलेले सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी लहान मूर्ती कृत्रिम तलावांमध्ये विसर्जित कराव्यात आणि मूर्ती तयार करताना माती व टिकाऊ साहित्य वापरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी जनजागृती मोहीम राबवावी, असा सल्ला दिला.

डॉ. काकोडकर यांनी त्यांच्या अहवालात रासायनिक रंगांच्या पर्यावरणीय धोक्यांकडे लक्ष वेधले असून पाण्याचे प्रदूषण कमी करण्यासाठी लोकजागृती आणि पर्यावरणपूरक मूर्तीनिर्मितीकडे वळण्याचे आवाहन केले आहे. राज्य सरकार आता या शिफारशींचा आणि पुढील अभ्यासाचा विचार करून न्यायालयास आपली भूमिका कळवणार आहे.

# मुंबई शहराला ४ नवीन पंपिंग स्टेशन

## ५ हजार कोटींच्या खर्चाचा अंदाज, केंद्राचा स्वतंत्र निधी मिळणार

**■मुंबई** : मुंबईत दरवर्षी पावसाळी पाण्याचा निचरा करणारी यंत्रणा ५५ मिमी प्रत्यक्ष तासाची क्षमता असलेली आहे. त्यामध्ये वाढ करून त्यापेक्षा जास्त पाऊस पडला तर पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करण्याचे आदेश आमदार आशिष शेलार यांनी मुंबई महापालिका प्रशासनाला दिले आहेत. तसेच यासाठी केंद्रीय गृह खात्याच्या नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंट ऑथॉरिटीकडून मुंबईला अधिकचा निधी मिळणार असल्याची माहिती शेलार यांनी दिली.

मुंबईत उद्भवणारी पूरस्थिती आणि पाण्याचा निचरा याबाबतच्या उपाय योजनांबाबत मुंबई उपनगर पालकमंत्री शेलार यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीला बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा, अमित सैनी, अभिजित बांगर यांच्यासह सबंधित अधिकारी उपस्थित होते.



**क्षमता वाढवण्याची आवश्यकता यासाठी**

२६ जुलै २००५ पूर्वी मुंबईत पावसाचा पाण्याचा निचरा करणारी जी गटारे होती त्यांची क्षमता ताशी २५ मिमी पाऊस झाल्यावर पाण्याचा निचरा करणारी होती. त्यानंतर गठित केलेल्या चितळे समितीने शिफारस केल्यानुसार त्यामध्ये वाढ करून आता ५५ मि. मी प्रत्येक तासाला पाऊस झाला तर पाणी वाहून नेणारी यंत्रणा उभारण्यात आली आहे. मात्र आता तासाला १०० मिमीपेक्षा जास्त पाऊस होत असल्याने ही क्षमता वाढवण्याची आवश्यकता असल्याचे समोर आले होते.

मुंबईत सरासरी दरवर्षी १६ ते २० दिवस पाऊस पडतो. हा पाऊस एका तासाला १०० मिमीपेक्षा जास्त असल्याचे पालिकेच्या अभ्यासातून समोर आले आहे. सन २०१४ ते २०१९ या कालखंडात तासाला १३१ मिमी तर १९ मे ला जो पाऊस झाला तो एका तासाला १८२ मिमी एवढा होता. २६ जुलै २००५ ला जो जलप्रलय झाला त्यावेळी मुंबईत सुमारे १ हजार मिमी पाऊस १६ तासात झाला होता. तर तासाला १३९ मिमी पावसाची नोंद झाली होती. त्याचवेळी समुद्राला भरती असल्याने प्रचंड पुराचा फटका मुंबईला बसला होता. आताही १०० मिमीपेक्षा जास्त पाऊस एका तासाला होत असून त्याचवेळी भरती असेल तर पाण्याचा निचरा होत नाही व पूरस्थितीचा सामना मुंबईला करावा लागतो.

ज्या भागात पाणी तुंबते अशी ठिकाणे निवडून त्या भागातील पावसाळी पाण्याचा निचरा करणारी यंत्रणा ही तासाला १०० मिमीपेक्षा जास्त पाऊस झाला तरी पाण्याचा निचरा करू शकेल, अशी उभारण्यात येणार आहे. याबाबतचा हा अहवाल आयआयटीच्या मदतीने तयार करण्यात येणार असून यासाठी सुमारे ५ हजार कोटींचा खर्च येईल, असा प्राथमिक अंदाज आहे. यासाठी नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंट ऑथॉरिटीकडून मुंबई महापालिकेला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होणार असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच हा आराखडा तयार करताना मुंबईतील रेल्वे, मेट्रो, एमएमआरडीएसह सर्व प्राधिकरणांचा समन्वय व चर्चा करुन हा अहवाल एका महिन्यात तयार करण्यात यावा, असे निर्देश मंत्री शेलार यांनी अधिकाऱ्यांना दिले.

# येत्या १५ दिवसांत चिंचोटी मार्ग होणार खड्डेमुक्त



या रस्त्यावर दीड ते दोन फूट इतके खोल खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे येथून ये-जा करताना शाळकरी विद्यार्थी, कामगार वर्ग, मालवाहतूकदार यांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. पावसाळ्यात जेव्हा खड्डे पाण्याने भरतात तेव्हा त्याचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघाताच्या घटना घडत आहेत. तर उंच सखल असा रस्ता असल्याने काही वेळा अवजड मालाचे वाहने कोसळू लागली आहेत. चिंचोटी -कामण -भिवंडी रस्त्यावर श्रमजीवी संघटनेच्या आंदोलनकर्त्यांचा तब्बल 12 तास ठिय्या आंदोलन सुरू होते. या आंदोलनाची प्रशासनाने दखल घेत येत्या पंधरा दिवसात रस्ता खड्डे मुक्त होणार असल्याचे आश्वासन दिल्यामुळे आंदोलकांनी आंदोलन मागे घेण्यात आले आहे, अशी माहिती आंदोलनकर्ते यांनी दिली आहे.

**■विरार** : मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या भिवंडी- कामण मार्गाची दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यात खड्डा की खड्यात रस्ता अशी स्थिती निर्माण झाल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. या अनुषंगाने श्रमजीवी संघटनेने रस्त्यातील खड्डे भरण्याच्या मागणीसाठी तब्बल १२ तास रास्तारोको आंदोलन केले होते.त्यानंतर येत्या १५ दिवसांत चिंचोटी मार्ग खड्डेमुक्त होणार असल्याचे आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याने दिले आहे.

चिंचोटी-कामण-भिवंडी रस्त्याच्या झालेल्या दुरावस्थेमुळे नागरिकांना धोकादायक प्रवास करावा लागत होता. याबाबत गुरुवारी श्रमजीवी संघटनेने चिंचोटी येथे रास्ता रोको आंदोलन केले होते. यावेळी हजारोंच्या संख्येने जनसमुदाय रस्त्यावर उतरला होता. या आंदोलनकर्त्यांनी सात ते आठ तास हा राज्य मागार्चा रस्ता रोखून धरल्याने दोन्ही बाजूने वाहतूक ठप्प झाली होती. चिंचोटी-कामण-भिवंडी रस्त्याची मागील अनेक वर्षांपासून अतिशय दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यावर पडलेले खड्डे यामुळे अपघातही घडतात.पावसाळा सुरू झाल्याने रस्त्याची आणखीनच बिकट अवस्था बनली आहे.

# बंदी काळात समुद्री माशांना पर्याय

**■वसई** : पावसाळा सुरू झाला आहे. पावसाचा मोसम सुरू झाला आहे. या मोसमात समुद्र खवळलेला असल्याने खोल समुद्रातील मासेमारीला बंदी आहे. बंदीकाळ असल्याने बाजारातील समुद्री माशांची आवक प्रचंड घटली आहे. समुद्री माशांना पर्याय म्हणून वसईच्या बाजारात सध्या खाडी आणि ओहळांतील वलग्नीच्या म्हणजेच चढणीच्या माशांचा पर्याय उभा राहिला आहे. हे मासे पकडून लागलीच बाजारात येत असल्याने ते ताजेच मिळत आहेत.



पावसाळ्याच्या सुरुवातीला प्रवाहित होणाऱ्या ओहोळ, नाल्यांमध्ये प्रवाहाच्या विरुद्ध चढणाऱ्या गोड्या पाण्यातील माशांना पालघर जिल्ह्यात वलग्नीचे मासे म्हणून संबोधले जाते. काही ठिकाणी या माश्यांना चिवणीचे मासे, चढणीचे मासे असेही म्हणतात. सध्या हे मासे मोठ्या प्रमाणात विक्रीला येत आहेत. जून ते ऑगस्ट दरम्यान राज्य शासन समुद्रातील मासेमारीवर बंदी घालते. हा काळ मत्स्य प्रजननासाठी राखीव असतो. बंदी काळात समुद्रात मासेमारी करणे कायद्याने गुन्हा मानला जातो. त्यामुळे सध्या बाजारात समुद्रातील मासळी मिळेनाशी झालेली आहे. त्यामुळे खाडी, नद्या, नाले आणि ओहळांतून मिळणाऱ्या माशांची मागणी मोठी आहे. गाव पाड्यांतील पुरुष व महिला पाग, झोळणे, लाकडी तोंड्या, भुसा व पारंपरिक गळांच्या सहाय्याने नदी-नाल्यांतील मासे पकडत आहेत. ही मासळी बाजारात किंवा घरोघरी विक्रीसाठी नेत असल्याने त्यांच्या उत्पन्नाचा मार्गही खुला झाला आहे.

# डिजिटल अटकेच्या नावाखाली शिक्षकाची फसवणूक

**■वसई** : वसईतील निवृत्त प्राचार्यांना डिजिटल अरेस्टची भीती घालून त्यांची सव्वा कोटींची फसवणूक केल्याची घटना ताजी असतानाच नालासोपारा येथील एका निवृत्त शिक्षकाचीही अशाच डिजिटल अरेस्टच्या नावाखाली ६० लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.तक्रारदार दिनानाथ मिश्रा (५८) हे निवृत्त शिक्षक असून नालासोपारा पूर्वेच्या संयुक्त नगर येथे राहतात. त्यांना मिळणाऱ्या निवृत्ती वेतनावर (पेंशन) त्यांचा उदरनिर्वाह चालतो. ७ मार्च रोजी त्यांना रंजु कुमारी नामक महिलेचा फोन आला होता. ट्राय नोटिफिकेशन सेल मधून बोलत असल्याचे तिने सांगितले. तुमच्या आधारकार्डाच्या आधारे सिम कार्ड घेऊन खंडणी आणि फसवणूक केल्याचा




गुन्हा टिळक नगर पोलीस ठाण्यात दाखल असल्याचे तिने सांगितले. यामुळे मिश्रा घाबरले. त्या महिलेने मिश्रा यांना सीबीआय अधिकारी संदीप राव यांचा मोबाईल क्रमांक देऊन त्यावर कॉल करण्यास सांगितले. मिश्रा यांनी त्या क्रमांकावर कॉल केला असता त्यांना व्हिडियो कॉल वर सीबीआय कार्यालय दाखविण्यात आले. तेथे दोन अधिकारी पोलीस गणवेशात होते. त्यांना मनी लॉंड्रींग केस मध्ये अटक केली जाणार असल्याचे त्यांना सांगण्यात आले. अटक टाळण्यासाठी मिश्रा यांच्याकडून ४४ लाख रुपये घेण्यात आले. हे पैसे त्यांनी आरटीजीएसद्वारे भरले. त्यांनतर ३ दिवसांनी त्यांना डिजिटल न्यायालयात हजर करण्यात आले. तेथे नकली वकील, न्यायाधिश हजर होते. मिश्रा यांना जामीन मिळवून देण्यासाठी पुन्हा २० लाख रुपयांची मागणी करण्यात आली. मिश्रा यांच्याकडे पैसे नव्हते. त्यामुळे त्यांनी नातेवाईकांकडून पैसे उसने घेऊन तसेच घरातील दागिने विकून पैसे गोळा केले आणि आरोपींना पाठवले. ७ मार्च ते २३ मार्च या कालावधीत त्यांची तब्बल ६० लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात येताच त्यांनी याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात माहिती अधिकार कायद्याच्या कलम ६६ (क) आणि ६६ (ड) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com